म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. २०८२

REFBK-0015118

निबंध
७५५९
११।३।७१
2082

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
* १९७० *

# गोव्याचें

# महाराष्ट्रांत विलिनीकरण

# कां ?

# व कसें ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
REFBK-0015118

नारायण देसाई

हि मा ल य प ब्लि के श न्स

किंमत दोन रुपये

प्रकाशिका:–
सौ. कुमुद देसाई.
धारगळ, पोस्ट कोलवाळ.
पेडणे–गोवा.

मुखपृष्ठ : व्ही. आर. खेडेकर.

प्रथमावृत्ती : १८ सप्टेंबर १९६६.

मूल्य : २ रुपये.

मुद्रक : व्ही. एस देशपांडे.
स्वस्तिक प्रिंटिंग प्रेस,
बेळगांव.

# अनुक्रमणिका


१. गोव्याच्या भवितव्याची ऐतिहासिक पार्श्वभूमि. ... १

२. विलिनीकरणाची स्वाभाविक प्रक्रिया. .... ९

३. गोवा-मुक्तीपूर्वी काय घडत होते ? .... १२

४. गोव्याचा इतिहास व जेजुइत पाद्री. .... १६

५ मराठी संस्कृतीची जीत. .... २२

६. मराठी समाजाची जडण घडण नि त्यामध्ये गोमंतकाचे स्थान. .... ३४

६. मराठी लोकांची कोंकणी बोली. .... ४०

८. लोकशाहीचा विकास आणि लोकभाषांचा प्रश्न. ... ५२

९. भाषिक राज्ये आणि काँग्रेस. .... ५८

१०. संधीसाधु प्रतिगामी राजकारण आणि म्हैसूरचा दावा. ... ६५

११. विलिनीकरणानेच्च गोव्याची समृद्धी साधेल. ... ६९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७५११८
ग्रं. शाखा १९७८

१

# गोव्याच्या भवितव्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी.

गोव्याचें महाराष्ट्रांत विलिनीकरण झालें पाहिजे असा बहुसंख्य गोमंतकीयांचा निर्धार वारंवार व्यक्त झालेला आहे. गोवा मुक्तिनंतर लगेच केंद्रसत्तेच्या प्रोत्साहनाने मराठी भाषेला दुय्यम स्थान देण्याचे प्रयत्न जेव्हां मराठीच्या विरोधकांकडून करण्यांत आले तेव्हां जनतेच्या उस्फूर्त प्रतिकाराने ते हाणून पाडण्यात आले.

गेल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्यें महाराष्ट्रवाद्यांच्या पदरांत बहुमत टाकून गोमंतकीय जनतेने आपला कौल जग जाहीर केलेला आहे. परिणामीं महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचें सरकार स्थानापन्न होऊन गोवा विधान सभेने गोवा महाराष्ट्र विलिनीकरणाचा ठरावहि संमत केला. त्याचबरोबर महाराष्ट्र विधानसभेने संमत केलेला तशाच आशयाचा ठराव आणि केंद्रसत्तेला केलेली शिफारस व मे १९६५ मध्यें पणजी येथें शिवाजी नगरांत झालेली विलिनीकरणवाद्यांची सर्वपक्षीय विराट परिषद ह्या सर्व ऐतिहासिक महत्वाच्या घटना होत. विलिनीकरणवादी आंदोलनातील

ते फार मोठे टप्पे असून आतां ह्या आंदोलनाने शेवटच्या पर्वांत पदार्पण केलेलें आहे व हें पर्व विजय-पर्व ठरेल याबाबत मुळींच शंका नाहीं. परंतु ज्या वास्तव परिस्थितीमध्यें या आंदोलनाचें सामर्थ्य अंतर्भूत आहे, त्या वास्तव परिस्थितीवर शक्य तितका अधिक प्रकाश टाकावा एवढाच ह्या पुस्तकांतील चर्चेचा हेतु आहे.

**'स्वतंत्र गोवा राज्या'ची मागणी तकलादु कशी ?**

आजच्या गोव्याचा केवळ एक पंचमांश भूभागच साडेचारशें वर्षें पोर्तुगीजांच्या ताब्यांत राहिला. एवढ्या दीर्घ मुदतीत एका जनविभागाला अराष्ट्रिकृत बनवून त्याला राष्ट्रबाह्य निष्ठा देण्यांत पोर्तुगीज साम्राज्यवाद्यांना अल्पसें यशहि मिळाले हें खरें आहे. या यशामुळेंच या प्रदेशांत एका विपरित वसाहतवादाचा एक नवा इतिहास निर्माण होऊं शकला व एक नवी ऐतिहासिक वास्तवताहि उदयाला आली. या वास्तवतेवरच 'स्वतंत्र गोवा' राज्याच्या मागणीचा पाया आधिष्ठित आहे.

" In recognition of the inevitable psycho-social, cultural, juridical and administrative conditions forged by the long hand of history" *(See pg. 1, Statehood for GOA. by All Goans' Convention.)*

पण ही नवी वास्तवता साम्राज्यवादी वसाहतवादाचें अपत्य असल्यामुळें ती तकलुपी वास्तवता ठरली आहे. ती या प्रदेशांत कधींच मूळ धरूं शकली नाहीं. त्याचे कारण भारतीय इतिहासाच्या गंभीरते-प्रदीर्घतेबरोबरच भारतीय इतिहासांच्या पोटांतील पंजाब, बंगाल, गुजराथ, महाराष्ट्रादि राष्ट्रीय समुदायांच्या इतिहासाची गंभीरता-प्रदीर्घता ही होय. पोर्तुगीज साम्राज्यवाद्यांनी सामाजिक

आर्थिक प्रांतात अभिजात असें कांहींच उभारलें नसून विध्वंस करण्यावरच त्यांचा भर होता. त्यांनी धार्मिक प्रातांत प्रचंड उलथा–पालथी केल्या पण ती इतिहासाची नव निर्माण शक्ति ठरू शकली नाहीं.

शिवाय, गोव्याची वसाहतवादी वास्तवता संपूर्ण गोव्यावर अगदींच अल्पकाल टिकूं शकली. कारण अंवती भंवती गर्दी करून असलेल्या मराठ्यांच्या छोटया मोठया राज्यांनीं ती अखंडपणें व दीर्घकाल टिकूं दिलीच नाही. जी दीर्घकाल टिकली असें आपण म्हणतों ती फक्त गोमंतकांतील ११ तालुक्यांपैकीं तिसवाडी, सासष्टी व बार्देश या जेमतेम तीन तालुक्यांपुरतीच !

**साम्राज्यवादी सल्तनतीचे अवशेष !**

गोव्याच्या मुक्तिनंतर अजून इथें उरले सुरलेले साम्राज्य-वादी सल्तनतीचे अवशेष म्हणजे फक्त धार्मिकच होत व त्यामुळेच विलिनीकरणाला विरोध होतो ही गोष्टहि खरी नव्हे.

आपआपल्या धार्मिकतेचा विकास करून महाराष्ट्र राज्यांत गुण्यागोविंदाने रहाणे कुणालाच अशक्य नाहीं. तसे तें ख्रिस्त्यांना पण नाहीं. लाखों ख्रिस्ती बांधव मुंबई महाराष्ट्रांत रहात आहेत. त्यांची देवालयें, त्यांच्या धार्मिक संस्था, त्यांचीं शिक्षण प्रसारक व खास धर्मप्रसारक विद्यालयें महाराष्ट्रांत सतत वाढत आहेत. तशीच पाद्रयांची संख्याहि तिथे वाढत आहे. भारताचे पहिले कार्डिनल यांचे वास्तव्यहि महाराष्ट्रांतच आहे. तेव्हां गोव्याच्या विलिनीकरण विरोधाचें मूळ धर्मवादांत नाहीं हें स्पष्ट आहे. मग तें मूळ कशांत आहे ?

महाराष्ट्र राज्य हें भाषा, संस्कृती, इतिहास व ठराविक सामाजिक आर्थिक परिस्थितीवर आधारलेलें एक राज्य आहे. भारतांत धर्मवादावर आधारलेलें राज्य असूँच शकत नाहीं. कारण भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे.

गोव्याचें महाराष्ट्रांत विलिनीकरण करण्यासाठीं जें आंदोलन उभें झालें आहे त्याचा पायाहि भाषिक–सांस्कृतिक–सामाजिक आर्थिक व ऐतिहासिक स्वरूपाचा असून धर्मवादाशीं त्याचा काडीइतकाहि संबंध पोहोंचत नाहीं.

अशा या आंदोलनाला जातीयवादी ठरवण्याचें पाप केंद्र सरकारांतील कांही प्रतिगाम्यांनी केलें आहे व या कामांत त्यांना म्हैसूरच्या व गोव्याच्या प्रतिगाम्यांचीहि साथ आहे. इतिहासाच्या प्रमुख शक्तींच्या वाटचालीची खबर नसणारे कांही अज्ञ लोकहि त्यामध्यें आहेत.

परंतु असें असूनहि विलिनीकरणाला जबर विरोध करणाऱ्या शक्ति प्रामुख्याने ख्रिस्ती गटांतीलच कां असाव्यात हा प्रश्न शिल्लक उरतोच. या प्रश्नाची उकल करण्यासाठीं भाषिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक कारणांबरोबरच ऐतिहासिक कारणांचाहि सखोल अभ्यास आणि साम्राज्यवादी इतिहासकालाचें शास्त्रशुद्ध परीक्षण आवश्यक आहे.

या प्रदेशाची मुक्ति होऊन आतां अनेक वर्षें लोटली असलीं तरी पोर्तुगीज कालीन जातीयवादी सुलतानीपणाची संवय अंगीं मुरलेले अवशेष अजून फार मोठ्या प्रमाणांत शाबूत आहेत. जुन्या समाजरचनेंत त्यांनी मिळवलेल्या मोक्याच्या स्थानांमुळें या

शक्ति अजूनहि जोरकस आहेत. अनेक हुद्द्यांच्या स्थानांवर त्या विराजमान आहेत. पोर्तुगीजकालीन नोकरशाही व पाद्रीशाही या पक्क्या पाश्चिमात्य वळणाच्या आणि अतिप्रतिगामी अशा शक्ति आहेत. या शक्तींना महाराष्ट्र राज्यांतलें वातावरण अनुकूल वाटत नाहीं.

या शक्ति किती शोषक व जुलमी आहेत तें प्रत्येक गोमंतकीयाला स्वानुभवानें माहित झालेलें आहे. व ही गोष्ट हिंदु बहुजन समाजाला जितकी परिचयाची व जाचक आहे तितकीच ती ख्रिस्ती बहूजनसमाजालाहि जाचक आहे. त्यामुळेंच ख्रिस्ती समाजाचाहि 'युनायटेड गोवन्स' पक्षाला भरीव पाठिंबा मिळू शकलेला नाहीं ही वस्तुस्थिती आहे. परंतु विलिनीकरण विरोधी शक्ति संख्येने अल्प असल्या तरी अक्कल हुशारीने बड्या आहेत !

भारताच्या आणि गोव्याच्या भवितव्याच्या बाबतींत इतिहास होता तिथें ठेवूं पहाणाऱ्या कांहीं बड्या लोकांचीं स्वप्नें व फार मोठ्या बहुसंख्येनें असलेल्या इतिहासाला पुढें नेणाऱ्या छोट्यांची स्वप्नें यांमध्यें सध्या घनघोर संघर्ष सुरू आहे. 'स्वतंत्र राज्य' ठेऊ पहाणाऱ्या शक्ति गोव्याचा इतिहास पोर्तुगीजांच्या वेळीं होता तिथें ठेऊं पहात आहेत तर विलिनीकरणवादी शक्ती त्याला प्रचंड प्रमाणावर बदलूं पहात आहेत. तो पुढें नेऊ पहात आहेत. म्हणजे या प्रश्नावर चक्क दोन छावण्या आज गोव्यांत तयार झालेल्या आहेत.

कांहीं किरकोळ सामाजिक, आर्थिक कारणांमुळें प्रतिगामी छावणीत शोभणाऱ्या कांहीं व्यक्ति पुरोगामी छावणीत दिसणें व

उलट पुरोगामी छावणींतल्या कांहीं व्यक्ति प्रतिगामी छावणीत दिसणे शक्य आहे. पण कांहीं व्यक्तींच्या वैयक्तिक आवडी-निवडीवरून इतिहासाला गति देणाऱ्या किंवा खिळ घालणाऱ्या शक्तीचें मूल्यमापन करतां येत नाहीं. अशा बाबी या अपवादभूत समजून सोडून देणेचें सैद्धांतिक दृष्टया इष्ट असतें.

**गोवा महाराष्ट्राचा संयुक्त वारसा**

विलिनीकरणवादी जनतेच्या गोवा-महाराष्ट्र ऐक्य भावनेच्या मागे शिवकालीन इतिहासच आहे असें नव्हे तर हजारों वर्षांचा महाराष्ट्राचा शिवपूर्वकालीन इतिहासहि आहे.

शातवाहन कालापासून तो भोज, चालुक्य, राष्ट्रकुट, शिलाहार, कदंब, यादव, विजयनगर व विजापूरच्या राज्यांपर्यंतचा हजारों वर्षांचा गोवा-महाराष्ट्राच्या संयुक्त जीवनाचा वारसा त्या भावनेमागे उभा आहे.

आजच्या बहुसंख्य गोमंतकीय समाजानें भारतीय समाजविकासाच्या वर्तमान अवस्थेंत उभें राहून आपल्या प्रदीर्घ जुन्या इतिहासांतून नवा इतिहास बनवण्याची ईर्षा बाळगावी यांत नवल कांहींच नाहीं. राष्ट्रीय एकात्मतेच्या व राज्यपुनर्रचनेच्या प्रश्नांकडे पहाण्याचा समग्र भारतीय जनतेचा असाच दृष्टिकोन आहे. बंगाल, महाराष्ट्र, आंध्र, तामिळनाड, केरळ व आतां पंजाब ही राज्यें ह्याच दृष्टिकोनांतून बनलीं आहेत.

इतिहासाबाहेर कोणच राहूं शकत नाहीं. नवा इतिहास बनवण्यासाठीं सुद्धां जुन्या इतिहासाकडे पहावेंच लागतें. अर्थात

त्या इतिहासाचे कुणाचें आवलन मूलभूत व शास्त्रशुद्ध असेल तर कुणाचें उथळ, भोंगळ असेल. कुणाचा दावा वास्तविक व वारसा सच्चा असेल तर कुणाचा दावा लटका किंवा काल्पनिक व वारसा तकलुपी असू शकेल. परंतु इतिहासापासून शिकणें हें मात्र एकाच दिशेनें होतां कामा नये. 'भूतकालाच्या प्रकाशांत वर्तमानकालाचें आकलन करणें म्हणजे भूतकालाचें आकलन सुद्धां वर्तमानकालाच्या प्रकाशांत करणें असा अर्थ होय.' सुविख्यात मार्क्सवादी तत्वज्ञ, शास्त्रज्ञ आणि इतिहासकार दिवंगत प्रा. डी. डी. कोसंबी यांनी हें **कार** प्रणीत सूत्र इतिहास लेखनाचें मार्गदर्शक तत्व म्हणून मान्य केलें आहे. (पहा पृ. ४ 'प्राचीन भारत'. ले.–डी. डी. कोसंबी.)

**साम्राज्यवादी अराष्ट्रीकरण**

तसें पाहिल्यास, पोर्तुगीज शासन कालीन गोमंतकीय जनतेचा इतिहास गोमंतकीय जनतेच्या मराठी बाण्याला आणि मराठी संस्कृतीला कमी गौरवशाली वाटेल असा खास नाहीं. फिरंगी शासनाने या चिमुकल्या प्रदेशाचें संपूर्ण अराष्ट्रीयकरण करण्याच्या हेतुने जंग जंग पछाडले. परंतु सुदैवानें फिरंगी साम्राज्यवाद्यांना या डावांत निर्णायक यश मात्र कधींच हासिल झालें नाहीं. म्हणूनच गोमंत मुक्ति व गोवा–महाराष्ट्र एकीकरणाची प्रचंड चळवळ या गोष्टी शक्य झाल्या.

आपला धर्म, आपली भाषा, आपले सामाजिक संस्कार, आपल्या चालीरीती, आपलें राज्य, आपलें राष्ट्र या जीवनमूल्यांपासून मुळासकट उपटून काढण्याचे प्रयत्न ज्या प्राणपणाने स्थानिक समाजाने हाणून पाडले त्याला साम्राज्यवाद्यांच्या समग्र

काळचाकुट्ट जागतिक इतिहासांत सुद्धा दुसरी जोड मिळणें कठिण आहे.

**गोव्याच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या व त्यांतून निर्माण झालेल्या भाषिक व सांस्कृतिक एकात्मतेच्या प्रश्नांमध्ये साम्राज्यवादी अवशेषांविरुद्ध लढ्याला जेवढें महत्व आहे तेवढें महत्व इतर भारतांतील राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रश्नांमध्ये मुळींच दिसलें नाहीं.**

याचें कारण हेंच कीं पोर्तुगीज साम्राज्यवादाने एका विशिष्ट प्रकारच्या ख्रिस्तवादाचा ( Lusitanian Christianity ) जो फार मोठ्या प्रमाणावर इथें प्रयोग केला तसा प्रयोग भारतांत इतरत्र कोणत्याच धर्मवादाचा झाला नाहीं. या प्रयोगाची गंभीरता डॉ. त्रिस्तांव ब्रागांझा कुन्हा यांनी वापरलेल्या गोमंतकीयांचें 'स्वत्वहरण' (Denaturalization of Goans) या शब्दांतच व्यक्त होते, (पहा 'गोव्याचा स्वातंत्र्य संग्राम' पृ. ५९–ले. डॉ. त्रि. ब्रां. कुन्हा.)

गोव्याच्या राजकीय भवितव्याचा यक्षप्रश्न तडीला नेण्याच्या दृष्टीनें या प्रश्नाची वरील ऐतिहासिक पार्श्वभूमी दृष्टिआड होऊं देता कामा नये

* * *

# २

## विलिनीकरणाची स्वाभाविक प्रक्रिया.

**या** प्रदेशाला आतां प्राप्त झालेलें स्वातंत्र्य व लोकशाहीचे प्राथमिक अधिकार यामुळें जनतेने आपल्या ऐतिहासिक व सामाजिक घडणीनुसार पुढें जाऊं पहाणे हें स्वाभाविकच आहे.

गोवा मुक्तिनंतर राष्ट्रीय एकात्मतेची प्रक्रिया जेव्हां सुरू झाली व भारतीय कायदे अमलांत आणण्याचा प्रश्न निर्माण झाला तेव्हां भारतीय कामगार–कायदे व शेती–सुधारणा इथें लागू करण्याला विरोध कोणी केला ? तर बहुसंख्य खाणमालकांनी, भाटकारांनी (जमीन मालक) व पोर्तुगीज धार्जिण्या बड्या नोकरशाहीने. गोमंत–मुक्तीला विरोध करणाऱ्या लोकांमध्येंही हेच प्रमुख होते व आतां पोर्तुगीजांच्या उरल्यासुरल्या सुलतानीपणाचे अवशेष कायम ठेवण्याच्या उद्देशाने विलिनीकरणाला विरोध करणारे लोकही प्रामुख्याने ह्यांच्यांपैकींच आहेत !

बहुजन समाजाच्या दृष्टीने गोमंतमुक्तीचा लढा जितका स्वाभाविक तितकाच भारतीय एकात्मतेचा आणि विलिनीकरणाचा

लढाहि स्वाभाविक आहे. आणि स्वाभाविकपणेच, कोंकणीच्या शाळांतून आमची जितकीं मुलें शिक्षण घेतात त्याच्या वीस पंचवीस पटीने अधिक मुलें मराठी शाळांतून शिक्षण घेत आहेत ही वस्तुस्थिती आहे.

त्याचप्रमाणें मराठी वृत्तपत्रांचा खप कोणत्याही अन्य भाषेंतील वृत्तपत्रांच्या खपापेक्षां दहा पटीने तरी खचितच अधिक आहे.

पोर्तुगीज साम्राज्यवाद्यांनी उभारलेली, गोवा आणि महाराष्ट्र यांना कृत्रिमपणें दुभंगणारी भिंत ज्या क्षणीं आम्ही पाडली त्याचक्षणीं भारतीय एकात्मतेच्या लढ्याबरोबर गोवा महाराष्ट्र एकीकरणाची किंवा विलिनीकरणाची प्रक्रिया स्वाभाविकपणें सुरू झाली. विलिनीकरणविरोधाला भरडीत भरधाव वेगाने ती आतां आगेकूच करीत चालली आहे याचेंहि कारण दुसरें तिसरें काही नसून ती प्रक्रिया ऐतिहासिक, वास्तविक व स्वाभाविक आहे हेंच होय.

**विरोधी शक्तींशी लढलेंच पाहिजे.**

परंतु कोणतीहि प्रक्रिया कितीहि स्वाभाविक असली व आपल्या स्वाभाविक क्रमाने आपलें मुक्काम ती गांठणारच हें निश्चित असलें तरी प्रत्येक समाजांत स्वाभाविक प्रक्रियेला सुद्धा विरोध करणाऱ्या अनिष्ट व स्वार्थी शक्ति नेहमीच उपस्थित होतात. या शक्तींना समाजांतील त्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थानाबरहुकुम कोणत्याहि स्वाभाविक प्रक्रियेची वाट रोखून धरतां येणे किंवा कोणत्याही स्वाभाविक प्रक्रियेला अस्वाभाविक

वळण लावण्यात कमी अधिक यश मिळवणेहि शक्य असतें. म्हणूनच स्वाभाविक प्रक्रियेबरोबर असणाऱ्या व ती प्रक्रिया पुढें नेणाऱ्या शक्तींना विरोधी शक्तीशीं सरळ मुकाबला करण्याची गरज निर्माण होते व क्वचित प्रसंगी जबर संघर्षहि छेडावा लागतो.

कोणत्याहि महत्वाच्या घटनेबाबत आपल्या बाजूला केवळ स्वाभाविकता, सत्य आणि न्याय असून भागत नाहीं तर स्वाभाविकतेला, सत्याला आणि न्यायाला विरोध करणाऱ्या अनिष्ट शक्तींचा विरोध हाणून पाडण्यासाठीं रण मांडावें लागतें. असें रण आतां गोव्यांत पेटलेलें आहे. या रणरणत्या अग्नीतून दैदिप्य-मान सत्य बाहेर पडण्याचा कालहि आता नजिक येऊन ठेपला आहे. साऱ्या देशाचे डोळे त्याकडे लागून राहिले आहेत. अशा प्रसंगीं आता नेकीने व इमानाने हें रण लढून तें जिंकणे एवढेंच आपल्या हातीं आहे.

* * *

# ३

## गोवा-मुक्ति पूर्वी काय घडत होतें ?

गोवा मुक्तिपूर्वी वस्तुतः काय घडत होतें ? जीं धोरणें भारत सरकार गोवा-मुक्तीचा प्रश्न सोडविण्यासाठीं म्हणून अंमलात आणींत असे त्या धोरणांनीं हा प्रश्न सुटण्याऐवजीं बिघडतच जाई. प्रथम मामुली स्वरूपाचा असलेला हा प्रश्न मग एक अव्वल दर्जाचा आंतरराष्ट्रीय प्रश्न होऊन बसला त्याचेही कारण भारत सरकारची हीं चुकीचीं धोरणें हेंच होतें.

भारत सरकाच्या त्यावेळच्या प्रत्येक पावलागणिक अनायासें हित जर कोणाचें साधता असे व समाधान जर कोणाला होत असे तर तें फिरंगी साम्राज्यवाद्यांना, त्यांच्या अँग्लो-अमेरिकन दोस्तांना, स्थानिक पाद्रीशाहीला, स्थानिक प्रस्थापित हितसंबंधांना, भाटकारांना आणि चोरीच्या व्यापारावर भरमसाठ गबर होत चाललेल्या नवीन धनिक वर्गाला होय.

मुरारजी देसायांच्या कृपाप्रसादाने भारतीय व्यापाऱ्यांची पोर्तुगीजांशीं संगनमतें चालत, मोसांबिकमधल्या भारतीय व्यापाऱ्यांना स्थानिक आफ्रिकन लोकांची पिळवणूक करण्याचे परवाने

मिळण्याची सोय होई व गोव्याच्या हद्दीवरील भारतीय पोलिसांची तर चंगळच चाले! चोरीच्या विराट व्यापारामुळे सरहद्दीवरील लोकांचा चोरीशिवाय दुसरा किफायतशीर धंदा नसे व म्हणून हे सारे आपमतलबी वर्ग भारत सरकारच्या मुक्तिपूर्व धोरणांवर बिलकूल खूष होते !!

**भारतसरकारची आडमुठी धोरणें**

परंतु या धोरणांपायी दुसऱ्या बाजूला मानहानी, यमयातना जर कुणाच्या नशिबीं आल्या असतील तर त्या सच्च्या स्वातंत्र्य-सैनिकांच्या व भारतांत पोट भरणाऱ्या व विशेषतः मुंबईवर जगणाऱ्या लाखों गोरगरीब श्रमजीवी जनतेच्या नशिबी होत. पोर्तुगीज फॅसिस्ट राजवटीखालीं चेंगरल्या जाणाऱ्या गोमंतकीय जनतेची तर दाणादाणच उडाली होती. भारत सरकारचें आज एक निवेदन तर दुसऱ्या दिवशीं नेमकें उलटेंच. जनतेच्या स्थानिक वैऱ्यांचें तर त्यामुळें अतिशय फावत असे.

भारत सरकारच्या या आडमुठ्या धोरणांनीं गोवा मुक्ति-साठीं लढणाऱ्या अनेक सच्च्या देशभक्तांचे मुडदे पडले. पत्रादेवी, बांदा, कॅसरलॉक, तेरेखोल व इतर ठिकाणीं झालेलें भारतीय स्वातंत्र्यवीरांचें बलिदान भारतीय जनतेच्या साम्राज्यवादविरोधी संग्रामाच्या इतिहासांत अमर आहे. आजपर्यंत झालेल्या स्वातंत्र्य-युद्धांच्या प्रसंगी अनेक शूर देशभक्तांनी हातांत बंदूक घेऊन अतुलनीय पराक्रम केले असतील. शस्त्रास्त्रांनीं सज्ज अशा शत्रूशी हातीं शस्त्र धरून मुकाबला केला असेल. पण शस्त्रसज्ज पोर्तुगीज सैन्यासमोर निःशस्त्रपणे जाऊन मृत्यूला आलिंगन देणे

**या स्वरूपाच्या शौर्याला जगाच्या इतिहासांत क्वचितच तोड सांपडेल !**

तथापि गोवा मुक्तीच्या अखेरच्या क्षणापर्यंत भारत सरकारचीं पूर्ण अपेशी झालेलीं हीं धोरणें कायमच होतीं. अखेर साम्राज्यवादो शक्तींवर लष्करी कारवाई द्वारा जबरदस्त टोला हाणून व समाजवादी शक्तींचें सहाय्य घेऊन गोवा प्रश्न सोडवावा लागला व आपला गोवा मुक्त झाला !

**गोवा मुक्तिनंतरहि तेंच घडलें !**

वास्तविक गोवा–मुक्तिनंतर या प्रदेशाचा अत्यंत महत्वाचा प्रश्न म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेचा व गोवा–महाराष्ट्र ऐक्याचा–विलिनीकरणाचा प्रश्न. परंतु इतिहासाची म्हणे पुनरावृत्ति होत असते ! एरवीं चुकीचें असें हें इतिहासाच्या पुनरावृत्तीचें तत्व दुर्दैवाने गोवा प्रश्नावर फिरून फिरून त्याच चुका करणाऱ्या भारत सरकारच्या गोवा धोरणाला मात्र तंतोतंत लागू होतें.

गोव्याच्या राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न सोडवण्याखातर भारत सरकार जीं धोरणे आंखतें त्या धोरणाने आज संतुष्ट कोण होतात ? तर प्रथम साम्राज्यवाद–धार्जिणे लोक, ख्रिस्ती समाजांतील एक अराष्ट्रिकृत टोळकें, पाद्रीशाही, प्रस्थापित हितसंबंधीवाला भाटकार वर्ग व पोर्तुगीज सुलतानोपणा अंगात मुरलेली जुनी नोकरशाही. अजूनहि ही परिस्थिती न बदलण्याला कारण कोण ? केंद्र सरकारची चुकीचीं व प्रतिगामी धोरणें. भारत सरकारचीं ही धोरणे अजूनहि जनविरोधी लोकांच्या तेवढीं पथ्यावर पडणारीं कां व्हावींत ? अर्थात हा अव्वल दर्जाचा राष्ट्रीय प्रश्न आहे. व ह्याचीं दोन कारणें सांगतां येतील.

एक म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रश्न पद्धतशीरपणे सोडवण्यासाठीं जी एक तात्विक बैठक हवी तीच केंद्र सरकारपाशीं नाही. फक्त गोवा प्रश्नापुरतेंच बोलावयाचें तर गोव्याचा इतिहास, संस्कृती, भाषा व परंपरा याबाबत केंद्र सरकारचें बौद्धिक मार्गदर्शन प्रतिगामी विचारवंतांच्या हातांत आहे.

दुसरें कारण अर्थात अधिक मूलभूत आहे. तें आजच्या भारतीय समाजरचनेशी, चालू राज्यकर्त्या वर्गाशीं व पक्षाशीं संबंधित आहे. ह्या कारणाचा उल्लेखच करावयाचा झाल्यास गोवा कॉंग्रेस व भारतीय कॉंग्रेसची स्थानिक हितसंबंधी वर्गाशीं जडलेली दोस्ती असें म्हणावें लागेल.

* * *

# ४

## गोव्याचा इतिहास व जेजुइत पाद्री

पहिल्या कारणाच्या–म्हणजे गोव्याचा इतिहास, संस्कृति, भाषा आणि परंपरा यांच्या योग्य आकलनाच्या बाबतींत केंद्र-सरकारच्या प्रमुख प्रवक्त्यांच्या कल्पना एकंदरीत चुकीच्या माहितीवर आधारलेल्या आहेत. सर्वसाधारणपणे या बाबतचें इंग्रजी साहित्य वाचूनच या लोकांनी आपल्या कल्पना बनवलेल्या असतात. व इंग्रजांनी मराठी लोकांच्या इतिहासाबाबतचें केलेलें लेखन हें बहुतांशीं साम्राज्यवादी हेतूनी केलेलें असल्यामुळें तें अपुरें व विपर्यस्त आहे. या विपर्यस्त लेखनाच्या प्रभावांतून भारतीय लेखकहि अजून पुरते सुटलेले नाहींत.

शिवाय या बाबतची इतिहास संशोधनाची बरीच करामत जेजुइत पाद्रींनीच केलेली आहे. जेजुइत पाद्रींची संस्था ही जगांतील प्रतिगाम्यांचा प्रमुख बौद्धिक अड्डा आहे ही गोष्ट जगजाहीर आहे.

परंतु आमच्या दुर्दैवाने या देशांतील उच्च शिक्षणाच्या कांही प्रमुख संस्थां अजुनहि या लोकांच्याच हातीं आहेत.

महाराष्ट्रांतील सेंट झेवियर वगैरे प्रमुख कॉलेजें या लोकांकडूनच चालवलीं जातात. एवढेंच नव्हे तर सरकार दरबारांतील उच्चपदस्थ लोकांमध्यें त्यांच्या शिक्षण-संस्थानांच महत्वहि दिलें जातें. भारतांतील चालू नोकरशाहीवर या लोकांचा बौद्धिक प्रभावहि बराच आहे. हा प्रभाव इतिहासाच्या क्षेत्रांत तर फारच दिशाभूल करणारा ठरलेला आहे.

खुद्द गोव्यामध्यें तर पोर्तुगीज साम्राज्यवादी शिकवतील तो इतिहास अशी परिस्थिती पूर्वी असल्यामुळें मराठी न जाणणाऱ्या पोर्तुगोज शिक्षितांचें मराठी इतिहासाचें आकलन भलतेंच विपरित ठरलें असल्यास त्यांत काहीच नवल नाहीं !

**धादांत खोटे निष्कर्ष !**

गोव्याच्या इतिहासाबाबत व त्या अनुषंगाने मराठ्यांच्या इतिहासाविषयीं साम्राज्यवादी प्रवक्त्यांनी दिलेली माहिती व काढलेले निष्कर्ष धादांत खोटे, विपर्यस्त व अंतीं साम्राज्यवाद्यांच्या कारस्थानांना पुष्टि देणारेच होते हें सप्रमाण सिद्ध करतां येणे शक्य आहे.

'गोमंतकाचा लघु इतिहास' ( A Short History of Goa ) या जेजुइत पाद्री **सी. एफ. सालदाना** याने लिहिलेल्या पुस्तकांतील पुढील निष्कर्ष पहा:-

१) आम्ही गोमंतकीय वेगळे लोक वेगळे राष्ट्र आहोंत.

२) गोवा हा कदंबाच्या राज्याचा भाग असून कदंब हे कानडी राजे होते.

३) गोवा तदनंतर कांही काळ विजयनगर ह्या कानडी साम्राज्याचा भाग होता.

४) परंतु आतां **गोवा देशांत** पूर्वीचे काही शिल्लक उरलें नसून गोव्याची एक स्वतंत्र संस्कृति निर्माण झालेली आहे. ही संस्कृती म्हणजे पौर्वात्य आणि पाश्चिमात्य संस्कृतीचा समन्वय आहे.

५) मराठा साम्राज्य निर्माण होण्यापूर्वी शंभर वर्षें **गोवा राष्ट्र** बनलें होतें.

या पाद्रीबोवाने त्याच पुस्तकांत पुढें गोव्यातले लोक हे आर्य, द्रवीड, अरब, हुण, आर्मेनियन, काश्मिरी, पंजाबी, रजपूत आणि मराठा यांचे कडबोळें असून हे लोक कोंकणी बोलतात अशी बोळवण केली आहे व म्हणून गोव्याचे लोक मराठी नाहींत असा निष्कर्ष.

**पण गोमंतकीय आहेत तरीं कोण ?**

गोमंतकीय कोण आहेत हें सांगताना पाद्री सालदाना याने गोमंतकीय हे भारतापासून वेगळे हें सिद्ध करण्याच्या भरात भारताच्या प्रदीर्घ इतिहासकालांत इथे आलेल्या अनेक लोकांचा उल्लेख केला आहे व गोमंतकीय हे या सर्व लोकांचे मिश्रण आहे म्हणून ते वेगळे आहेत असा निष्कर्ष काढला आहे. पण हा अजब निष्कर्ष सर्व भारताच्या बाबतहि तितकाच लागू आहे हें ह्या साम्राज्यवादी पंडिताच्या ध्यानीमनींहि नसेल !

हे सारे लोक जर गोव्यात होते तर पोर्तुगीजांनी जें साहित्य जाळलें त्यांत कितीसें आर्मेनियन साहित्य, हुण साहित्य, काश्मिरी साहित्य, पंजाबी साहित्य, राजस्थानी साहित्य होतें ते हे लोक सांगू शकतील काय ? अर्थात हें जाळलेलें साहित्य मराठी व संस्कृत होतें हें अनेक पोर्तुगीज इतिहासकारांनी सुद्धा स्पष्ट लिहून ठेवलें आहे. त्यांत कोंकणी साहित्यहि होते असें म्हणऱ्यांत फक्त **कुंज रिवारा** व **माँसिन्योर दालगादो** हे आहेत. परंतु या बाबतींत कोंकणी ही स्वतंत्र भाषा असावी असें आपलें मत Formation of Konkani ह्या पुस्तकांत देणारे भाषाशास्त्रज्ञ **डॉ. सुमित्र कत्रे** हे सुद्धा कोंकणी भाषेंत पूर्वी साहित्य होते व तें जाळलें गेलें असें मानावयास तयार नाहींत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

शिवाय, मराठे हे जर गोव्यांतील आर्मेनियन, पंजाबी, काश्मिरी यांसारखेच लोक आहेत तर त्यांच्या मराठी भाषेचा, मराठी संस्कृतीचा, मराठी चालींरीतींचा गोव्यांत एवढा प्रभाव कां हें विलिनीकरणविरोधी लोक सांगूं शकतील काय ? केवळ मराठे हे आमचे बलवान शेजारी हें उत्तर टिकणारें नाही. कारण कानडी लोकहि आमचे शेजारीच कीं ! पण कानड्यांचें गोव्यांत जें काहीं आहे तें दुर्बिणीने तरी दिसण्याइतकें आहे काय ?

**गोव्याच्या अराष्ट्रीकरणाचा अर्थ**

दुसरा एक प्रश्न असा आहे कीं गोव्याचें अराष्ट्रिकरण करण्यात आलें असें जे गोव्याचे एक श्रेष्ठ देशभक्त व मार्क्स-वादी विचारवंत दिवंगत त्रिस्ताव ब्रागांझा कुन्हा यानी आपल्या गोमंतकीयाचें अराष्ट्रिकरण ( Denatinalisation

of Goans) या पुस्तकांत लिहून ठेवलें आहे व या अराष्ट्रिकरणाची मजल गोमंतकीयांच्या 'स्वत्वहरणा' पर्यंत ( Denaturalisation ) पर्यंत गेली होती असें म्हटलें आहे त्याचा अर्थ काय ? त्याचा सरळ अर्थ हा आहे कीं पोर्तुगीजांनी गोव्याचें अराष्ट्रिकरण केलें म्हणजे गोमंतकीयांचे भारतीयत्वाशीं जोडणारे सबंध तोडण्याचा प्रयत्न केला. पण तो कसा व कोणकोणत्या उपायांनी त्यानी केला तें पहाणे अवश्यक आहे. गोव्याचें 'स्वत्वहरण' करण्यासाठी त्यांना तुळशीदासाचा 'दोह्यां' वर बंदी घालावी लागली काय ? नाहीं. गुरू नानकांच्या 'ग्रंथ साहेबा' वर बंदी घालावी लागली काय ? नाहीं. बसवेश्वराच्या 'वचनां'वर बंदी घालावी लागली काय ? नाहीं. तर ती बंदी प्रामुख्याने मराठी 'ओव्यां'वर (Ovios) घातली गेली याचा पुरावा उपलब्ध आहे. ( Edict 14 of April 1736 ) व 'ओवी' हें शुद्ध मराठी वृत्ताचे शुद्ध मराठी नांव आहे. तसेंच पोषाखावर जी बंदी घालण्यांत आली होती ती अचकन आणि चुरीदार पायजम्यावर किंवा लुंगीवर नव्हती तर ती 'धोतरा'वर व चोळीवर होती. (Edict of the Inquisition of 1736).

गोमंतकीयांचें अराष्ट्रिकरण करण्यांत पोर्तुगीजांना थोडेफार यश आलें असें आम्ही मागें म्हटलेंच आहे. खुद्द आर्चबिशप डॉ. थॉमस पोथाकामुरी यांचे पुढील उदगार ह्या बाबतींत अभ्यसनीय आहेत, "ख्रिस्ती बनलेल्यांचा एक वेगळाच वर्ग बनत असे. इतर समाजाशीं असलेले त्यांचे संबंध तुटत असत. आणि अशा रीतीने राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहापासून ते तोडले जात असत.

"Cut off from the mainstream of Indian national life" (Church in Independent India p 13).

गोमंतकीयांचें भारतीयत्व नष्ट करण्याचा प्रयत्न झाला म्हणजे वस्तुतः काय झालें हें लोकांनी हे प्रयत्न कसे हाणून पाडले व आपली मराठी संस्कृति कशी शाबूत ठेवली त्यावरून स्पष्ट होतें. पोर्तुगीज साम्राज्यवादाशीं झालेल्या मुकाबल्यांत गोमंतकीयांचें मराठीपण विजयी झालें हें सूर्यप्रकाशाइतकें स्वच्छ आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

# ५

## मराठी संस्कृतीची जीत

गोव्याच्या एका जनसमूहाला पाश्चिमात्य निष्ठा देण्यांत जरी साम्राज्यवाद्यांना अल्पसें यश आलें तरी हे लोक वास्तविक वेगळे बनणे शक्य नव्हतें. कारण भारत म्हणजे अमेरिका नव्हे. अमेरिकेंतील आदिवासी लोकांच्या संस्कृतीचा नायनाट करणें साम्राज्यवाद्यांना शक्य झालें. परंतु भारतांत पोर्तुगीजांना व विशेषत: जेजुइतांना एका प्रगल्भ संस्कृतीशीं, एका विकसित भाषेशी टक्कर द्यावी लागली. पोर्तुगीज इथें पोहाचण्यापूर्वीच किंवा त्यांचें लुजिअडस (Lusiadas) हें महाकाव्य निर्माण होण्या-पूर्वी कितीतरी आधीं मराठीने 'विवेकसिंधु' व 'ज्ञानेश्वरी' यांसारखे अखिल मानव जातीच्या साहित्य व विचारविकासाच्या क्रमांत दीपस्तंभाप्रमाणे तळपणारे ग्रंथ निर्माण केले होते. प्रख्यात भार-तीय कवयत्री महादंबेच्या 'धवळ्यां'नी मराठी लोकसाहित्यांत अपूर्व भर टाकली होती. महादंबेचे 'धवळे' हेच गोव्याचे 'धाले' होत. साम्राज्यवाद्यांच्या हातात कितीहि सत्ता असली तरी मरा-ठीशीं झालेल्या सामन्यांत त्यांना पराभवच खावा लागला.

गोमंतकातले ख्रिस्ती लोक सुद्धा खऱ्या अर्थाने वेगळे असे मुळींच बनले नाहींत. गोमंतकीय पाद्रींमध्येंहि मराठीपणाचे अभिमानी पाद्री अनेक निघाले व आजहि आहेत.

दि. ९ फेब्रुवारी १७४२ मध्यें फ्रान्सिस्कन युरोपीय पाद्रींनी फिरंगी राजाला एक पत्र लिहून अशी तक्रार केली होती की, गोव्याचे स्थानिक ख्रिस्ती प्रजानन आणि पाद्रीहि भोसल्याकडे सहानुभूतीने पहात आहेत. विशेषतः बार्देशमध्यें तर ही घटना घडलीच आहे असेंहि त्या पत्रांत आहे.

**ख्रिस्ती समाजाचें मराठीपण**

ख्रिस्ती समाज सर्वच्या सर्व विलिनीकरण विरोधी नाहीं. त्या समाजांतला बामण वर्ग तेवढाच हिरीरीने ‘स्वतंत्र गोवा राज्या’चा पुरस्कार करतो. युनायटेड गोवन्स पक्षाचे डॉ. **जॅक सिकेरा** हे या वर्गाचे अध्वर्यु आहेत.

पंचवीस तीस बर्षांमागें कवळें येथें भरलेल्या ‘प्रागतिक संघा’च्या एका बैठकींत पणजी येथील त्यावेळचे नामांकित वकील व पुढारी **गोमिश परेरा** पोर्तुगीज भाषेंत भाषण करतांना म्हणाले होते, “ज्या भाषेंत माझे पूर्वज बोलत होते व ज्या भाषेंत माझे वंशज यापुढें बोलणार आहेत त्या मराठीमध्यें आज या ठिकाणीं बोलतां येत नाही याबद्दल खेद होतो.”

कुंभारजुवेचे बॅरन **थॉमस मोवराव** हे एक नाणावलेले शिक्षणप्रेमी गृहस्थ होते. हिंदु लोकांना शिक्षित करण्यासाठीं मराठीचाच वापर केला पाहिजे अशा मताचे ते होते. इतकेंच

नव्हे तर त्यासाठीं त्यानीं स्वखर्चाने 'राम विजय' छापून घेतला. 'देश सुधारणेच्छु' हें साप्ताहिक काढलें व काही मराठी पाठ्य-पुस्तकेंहि तयार करवून घेतली. 'गोमंतकातले सुविख्यात पुढारी आणि मुत्सद्दी **फ्रान्सिस्कु लुइश गोमीश** (१८२९-१८६१) यांचेहि मत मराठीच्याच बाजूनें होतें. ( Selected works of Francisco Luis Gomes, 39) **प्रो. फ्रान्सिस्कु कुरेया आफोंसो** आणि **प्रो. जुस्तिन डी सोवझा** हेहि मराठीचे अभिमानी व समर्थक होते. **प्रो. डी सोवझा** लिहितात. " There can be no question that Marathi is one of the leading modern Indian languages and it is destined to play an important part in the shaping of the fortunes of the Bombay Prsidency **of which Goa is territorially speaking part and parcel"** *("The Goan world" magazine published by prof. Justin D'Souza.)*

देशभक्त टी. बी. कुन्हा यांचे विद्वान बंधु डॉ. ब्रागान्झा कुन्हा पॅरिसमध्यें असतांना जगप्रसिद्ध फ्रेंच पौर्वात्य विद्यापंडित सिल्वां लेवी यांच्या घरी त्यांचा आणि महापंडित **राहुल सांकृत्यायन** यांचा परिचय झाला. त्या परिचयांत डॉ. कुन्हा **यांनी** राहुलजींना आपण गोव्याचे असून आपलें घराणे शातवाहन घराण्याशीं संबंधित आणि आपली भाषा मराठी आहे असें सांगि-तल्याचा उल्लेख राहुलजींच्या 'युरोप की यात्रा' या पुस्तकांत आढळतो. (पृ. १३४)

७५५१९ दि. ...
२...१२... १८/१२/०७



ओलिवेयरा मार्तीश या पोर्तुगीज इतिहासकारानेही गोव्यांतील मराठीच्या स्थानाविषयीं अनुकूल मतप्रदर्शन केलें आहे.

**भांसामाजी चोखाळा मराठी !**

ख्रिस्ती बांधवांनी सुद्धा मराठी भाषेची अमोल सेवा केली असल्याचे पुरावे गोमंतकीय मराठी साहित्याच्या इतिहासांत आहेत. त्या कालांत ज्याप्रमाणें **कृष्णदास शामा** (१५५५) यांनी 'कृष्ण चरित कथा' **विष्णुदास नामा** यांची 'प्रल्हाद चरित कथा' **तुकाराम बाबा वर्दे** कृत 'सुभाषित रत्नावली' **महेश्वरबाबा सुखटणकरकृत** 'अमर विवेक' (१७५०) 'सिद्धांत चंद्रिका' 'पानचषक' **नायक स्वामीकृत** 'शिवगीतेवरील टीका' **केरीकरांचा** 'शुकरंभासंवाद' **पांडोबा कैसरे** यांचें 'द्रौपदी स्वयंवर' **सोयरू भट्टकृत** 'विवेक चूडामणी' व **सोयरोबानाथ आंबिये** यांनी 'सिद्धांत संहिता' रचली त्याचप्रमाणे फादर **एसियान द लाक्रुआ** यानी रचलेलें संत पिटरचें पुराण (१६२९) **आंतोनियु द सालदांज** यांनी लिहिलेली 'आंतोनीची जिवित कथा' (१६५५) आणि 'जैसी हरळामाजी रत्नकिळा, की रत्नांमाजी हिरा निळा, तैसी भासांमाजी चोखाळा भासा मराठी' हे शब्द ज्याने आपल्या 'ख्रिस्तपुराण' या दहा अकरा हजार ओव्यांच्या मराठी ग्रंथांत (१६१६) अमर केले त्या **फादर स्टिफन्सचाहि** उल्लेख केला पाहिजे.

**अभिजात साहित्याची निर्मिति**

गोमंतकीयांचें वर उल्लेखलेलें व इतर बरेंच अभिजात मराठी साहित्य कशाचें द्योतक आहे ? या साहित्याइतकें गुण-

समृद्ध व संख्यासमृद्ध साहित्य गोमंतकीयांनी पोर्तुगीज, इंग्रजी, फ्रेंच, लॅटिन, पंजाबी, उर्दु, कानडी, तामीळ इतकेंच कशाला कोंकणींत तरी केलें असल्याचा दावा कोणी करूं शकेल काय? आणि पोर्तुगीजांचा अनन्वित भाषाछल जर नसता तर गोव्याचे मराठी साहित्य आणखी किती तरी पटींनी अधिक समृद्ध झाले असते!

जगांतल्या इतर सुशिक्षित लोकांप्रमाणे गोमंतकीयांनीहि संस्कृत, पोर्तुगीज, लॅटीन, फ्रेंच, इंग्रजी आदि भाषांतून कांही किरकोळ ग्रंथ निर्मिती केले हें खरें आहे. शिवाय ख्रिस्ती धर्मप्रसाराचें गोवा हें केंद्र असल्यामुळें इथूनच चारहि बाजूंना धर्म प्रसारक पाठवले जात. धर्म–प्रसाराच्या सोयीसाठीं त्यांना अनेक भाषाहि शिकवल्या जात असत व साहजिकच या लोकांनी अनेक भाषांतून कांही ग्रंथनिर्मिती केली आहे.

गोमंतकीयांनी मराठी साहित्यांत घातलेली भर मोलाची असून केवळ एखाद्या दुसऱ्या व्यक्तीच्या असामान्य प्रज्ञेचा वा प्रतिभेचा तो चमत्कार नव्हे तर अगदीं सहज स्वाभाविकपणे आणि आत्मियतेने आपल्या मातृभाषेच्या चरणीं अर्पिलेली ती सेवा होय. गोमंतकीय मराठी साहित्यिक हे कोणी मोठे पढलेले पट्टीचे विद्वान होते व कोणतीहि भाषा ते पेलूं शकत होते तशीच मराठी त्यांनी पेलली असें म्हणणें हें बिलकूल वस्तुस्थितीला सोडून होईल.

## महाराष्ट्र द्वेष का वाढला ?

खरी वस्तुस्थिती अशी आहे कीं पोर्तुगीज कायद्यांची व शासनाची पर्वा न करतां ख्रिस्ती बांधवांनी अनेक प्रसंगीं व

अनेक वेळां आपण मराठी आहोंत असे मोठ्या अभिमानाने बोलून व लिहूनहि ठेवलें आहे. परंतु गेल्या एकोणीस वर्षांत म्हणजे भारत स्वतंत्र झाल्यापासून काँग्रेस पक्षाने अवलंबिलेल्या काही चुकीच्या धोरणांमुळें गोमंतकीय जनतेची प्रचंड प्रमाणावर दिशा-भूल झाली.

विशेषतः भारताचे गोंव्याशी असलेले निकटवर्ती संबंध संपूर्णपणे तोडून टाकण्याच्या अपेशी धोरणाने साम्राज्यवादी विचारसरणीची पकड ढीली होण्याऐवजी गोमंतकीय समाज-जीवनावर उलट अनिष्ट परिणाम घडून आले. सांस्कृतिक दृष्टया गोमंतकीयांची एक पीढी बरबाद झाली. या कालांतील सुशिक्षित पीढी भारतीय संस्कृतीपासून संपूर्णपणे अलग पडली व पाश्चात्यि-करणाला ती बळी पडली. या पीढीची विचारसरणी व भारतीय विचारसरणी यांमध्यें असलेलें जमिन अस्मानाचें अंतर वाढतच गेलें.

पोर्तुगीज हुकुमशाहीमुळें स्वातंत्र्य प्राप्तिचा लढा व्हावा तेवढा व्यापक कधीच होऊं शकला नाहीं. त्यामुळें ह्या पीढीवर स्वातंत्र्यवादी विचारांचा पगडाहि बसू शकला नाही. हीच पीढी गोव्यांतील नोकरशाही राज्यकारभार आणि उद्योगधंदे आज चालवते.

त्या कालांत वावरणाऱ्या अनेक लोकांच्या भारतीय भाव-नेलाच कीड लागली व गोमंतकीय जनतेच्या भारतीय भावनेचें माध्यम जें मराठीपण त्याबाबतहि अपसमज व भलताच आकस प्रतिगामी लोक मुद्दामच निर्माण करीत गेले.

आजहि प्रतिगामी शक्ति आपल्या स्वार्थी व संकुचित हेतुसाठीं महाराष्ट्रविरोधी भावना वाढवीत आहेत.

**घाटावेले चोर**

राष्ट्रविरोधी व प्रतिगामी विचारसरणीला बळी पडलेले कांहीं लोक 'घाटी' किंवा 'घाटावेले चोर' हें अभिधान गोवा मुक्त करणाऱ्या किंवा त्यांच्या दृष्टीने गोवा जिंकून घेणाऱ्या भारतीयानां लावतात. 'गोयां भायले' (Alem Gates) सारे भारतीय घांटीच असून संस्कृतीने ते हलके आहेत, चोर आहेत वगैरे कल्पना ते सोडावयाला तयार नाहींत. गोव्याचे भारतात आता पक्केपणी विलिनीकरण होऊन गेलेले असल्यामुळें ह्या लोकांनी 'घाटी' हें अभिधान सध्या मराठी लोकांना लागू करण्याचे प्रयत्न चालवले आहेत. वस्तुतः मराठी म्हणजे घाटी हें समीकरणही चक आहे. कारण सगळे मराठी घाटी नव्हेत.

आपण करीत असलेले जनतेचें शोषण दडवून ठेवण्यासाठीं जनतेच्या हलाखीच्या परिस्थितीचें काहीतरी वेगळे कारण दाखवण्याची प्रतिगामी लोकांना नेहमीच संवय असते.

दिवसेदिवस जनतेची परिस्थिती अतिशय बिघडत चालली आहे. या परिस्थितीला 'घाटावेले चोर' कारणीभूत आहेत असे कारण दाखवून लोकांचे लक्ष आर्थिक कारणांवरून प्रांतवादाकडे लावण्याची त्यांची शिकस्त चालू असते.

जनतेला लुबाडणाऱ्या चोरांना शोधण्यासाठीं वास्तविक घाटमाथा चढून जाण्याची मुळीच आवश्यकता नाहीं. पोर्तुगीज

साम्राज्यवाद्यांच्या पंखाखाली पोसलेले आणि गोव्यापासून दिल्लीपर्यंतची संपूर्ण काँग्रेससत्ता ज्यांना पोशित व वाढवित आहे असे अस्सल घबाड चोर घाटमाथ्याखालीहि काही कमी नाहींत !

**काँग्रेसचा विलिनीकरण विरोध**

**काँग्रेसने इथल्या प्रतिगामी विचारसरणीचा पाडाव करण्याचें काम खंबीरपणें हातीं घेण्याऐवजी उलट इथल्या प्रतिगामी वर्गाशीं दिलजमाई करून जणू गोवा मुक्त करण्याच्या पापाचें शमनच चालवलें आहे !** शिवाय ज्या प्रतिगामी वर्गाला काँग्रेसनें हाताशीं धरलें त्यांमध्यें साम्राज्यवादी अवशेष आणि जातीयवादी प्रवृत्ति शिरजोर असणारा वर्गच प्रामुख्याने आहे. त्यामुळेंच अखिल भारतीय काँग्रेसला विलिनीकरण विरोध व महाराष्ट्र-द्वेषाला सुद्धा अप्रत्यक्ष पाठिंबा द्यावा लागला.

या गोवाद्रोही व महाराष्ट्रद्रोही कारस्थानांत दिवंगत पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंच्या फ्रेंच, पोर्तुगीज आदि पाश्चिमात्य संस्कृतिविषयींच्या व्यक्तिगत उदारमतवादाचा पुरेपूर फायदा उठवण्यात आला. मराठ्यांच्या इतिहासावरील जेजुइत पाद्रींच्या किंवा त्यांची री ओढणाऱ्या भारतीय लेखकांच्या असत्यांनी भरलेल्या ग्रंथांची साक्ष काढून महाराष्ट्रावर ठपका ठेवण्याची संधीहि साधण्यात आली. मराठ्यांची संस्कृति वेगळी, गोव्याची संस्कृति वेगळी; मराठ्यांची संस्कृति आक्रमक, विस्तारवादी व घातकी आहे; मराठ्यांचा राजा शिवाजी खुनी होता वगैरे नाना तऱ्हेचे आघात गोव्यातील मराठी जनतेवर करण्यात आले.

**महाराष्ट्र हें राष्ट्र, का भाषिक राज्य कां राष्ट्रीय समुदाय ?**

भारताबाहेरच्या व भारतांतील अनेकांचा महाराष्ट्रावरच एवढा दांत का यालाहि तसेंच सबळ कारण आहे. अख्ख्या भारतांत साम्राज्यशाद्यांना दे माय धरणी ठाय जर कोणी करून सोडलें असेल तर तें मराठ्यांनीच. तसेंच भारतामध्यें राष्ट्रवादी भावनेशी प्रखर असा मुकाबला जर त्यांना कुठे करावा लागला असेल तर तो मराठी मुलखांतच.

ब्रिटिशांनी भारत मुसलमानांकडून जिंकून घेतला ही कल्पना खरी नसून प्रामुख्याने तो त्यांनी मराठ्यांकडून घेतला ही गोष्ट ब्रिटिश इतिहासकार **ग्रांट डफ** यांनी सुद्धा मान्य केली आहे. तो मराठ्यांना "Our Predecessors in conqest in India" असें म्हणतो. या संदर्भात **महर्षि रानडे** यांचे मौलिक विचार इथें नमूद करण्याचा मोह आवरतां येत नाही. "European writers who have condemned the Indian races for their want of a national feeling have themselves been forced to admit exceptions in the case of the Marathas, Rajputs, and Sikhs"

ते पुढें म्हणतात, "This feeling of patriotism illustrates most forcibly the **formation of a Nation** in the best sense of the word and constitutes another reason why the history of the Marathas, deserves special study. It is the history of the formation of a true Indian Nationality raising its head high above the

troubled waters of Mahomedan confusion." ( "Rise of the Maratha Power' by Mahadev Govind Ranade p. 4 ).

वरील उताऱ्यांत महर्षि रानडे ज्याला मराठी राष्ट्रीयत्वाची घडण असें म्हणतात त्यालाच आतां स्वतंत्र भारत राष्ट्राच्या संदर्भांत व शास्त्रशुद्ध परिभाषेंत 'राष्ट्रीय समुदाय' ( national group ) म्हणतात.

" A national group is an historically constituted relatively stable community of people which precedes the formation of a nation. A national group forms on the bases of three elements of a nation (For Nation the aggregate of four characteristics is necessary.) which are in the process of formation and development :- 1) Common Language 2) Common Territory 3) Common Psychological make-up which manifests itself in a common culture. *(The principle of national self determination by G, Starushenko p. 15).*

भारत संघराज्य हें आमचें राष्ट्र आहे. तर महाराष्ट्र हा भारतांतर्गत एक राष्ट्रीय समुदाय आहे. मराठा ही एक जात किंवा वंशहि नव्हे तर एक राष्ट्रीय समुदाय आहे. अशा समुदायांची अस्मिता हीच खरी भाषिक राज्यांचा पाया आहे. या बाबतचें भारतीय विचारमंथन अजून बाल्यावस्थेंत असल्यामुळें भारतीय राज्यपुनर्रचनेच्या प्रश्नावर आवश्यक तेवढा प्रकाश दिसत नाहीं.

भारतीय संघराज्यामध्यें भाषिक राज्यें कोणत्या तत्वावर उभारली गेलीं व उभारलीं जाणे आवश्यक आहे याचें आणखीहि संशोधन होणे अगत्याचें आहे. कारण काशी ते रामेश्वर एकच भारतीय भावना समाहित आहे हे जेवढें खरें, तेवढेंच या भारतांत प्रदीर्घ इतिहासकालामध्यें आपआपली समुदाय-अस्मिता प्राप्त करून घेतलेले महान समुदाय आहेत हेंहि खरें आहे. हे अस्मिता-प्राप्त समुदाय वांशिक, जातीय किंवा कांटेकोरपणाने भाषिकहि नव्हेत, तर ते ऐतिहासिक आहेत. पूर्वेकडच्या राष्ट्रीय मुक्तिसंग्रामाचें विवरण करतांना लेनिन म्हणतात.

"In short, the very history of its rise testifies to the fact that the national community is not a racial or tribal but **a historical community**. Consequently the concept. "National group" and the concept "nation" into which a national group evolves are "**historical categories**" (*Lenin' The National Liberation Movement in the East.' p. 189*).

राष्ट्रीय समुदायांच्या संदर्भात एकभाषिकत्व असें ज्याला आपण म्हणतों व ज्यावर भाषिक राज्याची कल्पना आधारतों त्याबाबत एक महत्वाची गोष्ट ही की, राष्ट्रीय समुदायाची भाषा जमातींच्या भाषांमधून बनत असल्यामुळें एकभाषिकत्वा-बरोबरच भिन्न बोलीचें अस्तित्वहि दीर्घकाळ टिकून राहतें. त्यामुळें राष्ट्रीय समुदायाला एकभाषिकत्वाच्या बाबतींत

लवचिक धोरण स्विकारणे आवश्यक होतें. इतिहासाची ती गरज असते. कारण आर्थिक व राजकीय केंद्रिकरणानंतरच भिन्नभिन्न बोलींचें केंद्रिकरण घडतें व एक ग्रंथभाषा तयार होते.

'Concentration of dialects into a single national language is due first and foremost to economic and political concentration.' (*K. Marx, F. Engels p.* 414 vol IV).

* * *

६

# मराठी समाजाची जडण घडण नि त्यामध्यें गोमंतकाचें स्थान

साऱ्या भरतखंडांत आपल्या प्रादेशिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक गुणविशेषांनी महाराष्ट्र अतिप्राचीन कालापासून ख्यातनाम आहे. गोदावरीचे खोरें हे मराठी संस्कृतीचें जन्मस्थान ! या खोऱ्यांत मनुष्याच्या प्राचीनतम वस्तीचे अवशेष मिळालेले आहेत. पुरातत्ववेत्त्यांनी केलेल्या संशोधनानुसार इसवी सनापूर्वी सुमारे पांच लक्ष ते तेवीस लक्ष वर्षें असा महाराष्ट्राच्या आद्य मानवी संस्कृतीचा अंदाज घेतां येतो.

गोदाकांठी या मराठी संस्कृतीचें संवर्धन झालें तर कृष्णा आणि तिच्या उपनद्या व दऱ्याखोऱ्यांनी बाह्य आक्रमकांपासून तिचें रक्षण केलें.

अति प्राचीन कालापासून महाराष्ट्राच्या प्रदेशांत उत्तर भारतांतील व दक्षिण भारतांतील लोक शिरत होते. एवढेच नव्हे तर ह्याच मार्गें येऊन शकादि भारताबाहेरचे लोकहि महाराष्ट्रांत

पोहोंचून स्थायिक झाले. शातवाहन राजे हे अशाच लोकांपैकी असावेत.

**शातवाहन काल–**

**महाराष्ट्राच्या सीमानिश्चितीचा काळ !**

शातवाहन काळ (ख्रिस्तपूर्व तिसरें शतक) हाच महाराष्ट्राच्या एकीकरणाचा व सीमा निश्चितीचा काळ होता आणि उत्तरेकडच्या लढायांमुळे आजच्या महाराष्ट्राचें स्वरूप कायम झालें असें मानलें जातें.

सातव्या शतकाच्या आरंभींच दक्षिणेत असलेल्या मुख्य तीन राज्यांतले राजे महारठ्ठी उर्फ मराठ्ये होत. प्राचीनकाळीं विदर्भ व मराठवाडा हे महाराष्ट्राच्या केंद्रस्थानीं होते.

शालीवाहन त चालुक्यांची राजधानी मराठवाड्यांतील पैठण येथे होती तर वाकाटक या राजधराण्याने महाराष्ट्राचा सर्व प्रदेश आपल्या छत्राखाली आणला होता.

वाकाटकांचें शासनयुग हें भारतीय इतिहासातील 'गुप्तयुगा' प्रमाणें 'सुवर्णयुग' समजले जातें. वाकाटक विदर्भाचे राजे होते व त्यांची राजधानी चांद्याजवळ भोदक येथें होती. वऱ्हाड, मराठवाडा, खानदेश इथें मुख्यत्वेंकरून महानुभावीय ग्रंथकार निर्माण झाले. मराठवाड्याने महाराष्ट्राला ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास दिले.

भौगोलिक दृष्ट्या वेगवेगळे स्वाभाविक विभाग, कारवारी, गोमंतकी, कुडाळी, मालवणी, खानदेशी, वऱ्हाडी धरून अनेक

बोलीभाषा व अनेक उपसंस्कृतीचा बनलेला महाराष्ट्रीय समाज आहे. तथापि मराठी समाजाची आंतरिक ऐक्य–भावना ठसठशीत असून मराठी संस्कृतीची समानता वास्तविक व गतिमान अशीच आहे.

## बहुरंगी महाराष्ट्र

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमुळें महाराष्ट्रीय समाजाची भावनिक एकात्मता आतां सतत वृद्धिगत होत आहे. अर्थात देशाच्या भांडवलदारी विकास पद्धतीमुळें प्रत्येक विभागाच्या विकासामध्यें विषमता राहून त्यामुळें घटक राज्यांतील प्रदेशांमध्येंहि विकासाची गति आणि फळनिष्पत्ति यांबाबत अंतर्विरोध व खटके संभवतातच. हे अंतर्विरोध जसे राज्याराज्यांमध्यें आहेत तसेच ते प्रत्येक राज्यांतर्गत प्रदेशा प्रदेशांमध्यें आहेत, शहरा शहरांमध्यें आहेत, समाजा समाजामध्यें आहेत. वस्तुतः हे अंतर्विरोध वर्गीय स्वरूपाचे असून भांडवलदारी समाजरचनेच्या अंगांप्रत्यंगांमध्यें ते सतत वाढत रहातात.

औद्योगिक विकासातील विषमतेचेंच उदाहरण घेऊं या. अख्ख्या भारतात फक्त दिल्ली, कलकत्ता, मुंबई व मद्रास या चार केंद्रांमध्येंच ७० ते ८० टक्के भांडवल गुंतवलें गेलें आहे. मग इतरांचें काय होणार ?

या विषमतेमुळें आंध्र प्रदेशांतील सरकार व रायल सीमा जिल्ह्यामध्यें विरोध; केरळ राज्यातील त्रावणकोर कोचीन व मलबार विभागामध्यें विरोध; गुजराथ राज्यांतील स्वतंत्र सौराष्ट्राची चळवळ वगैरे अनेक कलह आज आपल्या समोर

आहेत. त्याचप्रमाणे कांहीं प्रमाणांत रास्त व कांही प्रमाणांत प्रतिगामी हितसंबधी लोकांनी पेटवलेली स्वतंत्र विदर्भाच्या मागणीचीहि एक बाब आहेच.

प्राचीन काळापासून सुद्धा महाराष्ट्राची एकात्मता म्हणून कांहीं चीज होतीच. तथापि महाराष्ट्र संस्कृतीचें वस्त्र एकरंगी आहे अशी कल्पना कोणाची असल्यास ती मात्र चुकीची आहे. कारण महाराष्ट्र संस्कृतीचें वस्त्र फार व्यापक व विशाल असून या वस्त्राला बहुरंगी महावस्त्रच म्हटलें पाहिजे.

महाराष्ट्राचे चार स्वाभाविक विभाग पडतात. १) कोंकण-पट्टी, २) गोदा–कृष्णा नद्यांच्या खोऱ्यांतील प्रदेश, ३) तापी-पूर्णेच्या खोऱ्यांतील प्रदेश ४) वर्धा–वैन गंगेच्या खोऱ्यांतील प्रदेश.

या विभागांच्या भिन्न भौगोलिक परिस्थितीमुळें आणि दळण वळणाच्या अडचणींमुळें महाराष्ट्राच्या चार प्रमुख उप-संस्कृत्या बनलेल्या आहेत. **कोकण व घाट यामध्यें जरी प्राचीन काळापासून संबंध होता तरी दळण वळण कष्टाचें असल्यामुळे कोंकण व देश या दोन उपसंस्कृतींमध्यें भिन्नता आढळणे स्वाभाविक आहे. अर्थात या भिन्नतेवर आधारून 'कोकणी' किंवा 'किनारा' प्रांताच्या मागणीपर्यंत भरारी मारणे हें शुद्ध काल्पनिक उड्डाण आहे !** (हें उड्डान 'युनायटेड गोवन्स' पक्षाचे नेते डॉ. जॅक सिकेरा यांनीं केलें आहे. ना.स. का पाटील व इतर कांही मंडळीचा आपणाला पाठिंबा आहे, असेंहि ते सांगतात. पण घटक राज्य निर्मितीच्या तत्वांचा व जनमताचा त्याला मुळींच आधार नाहीं हें उघडच आहे.)

### महाराष्ट्रांत गोमंतकाचें स्थान

वर वर्णन केलेल्या महाराष्ट्राच्या बहुरंगी महावस्त्रांतील आडव्या उभ्या धाग्यांच्या रंगछटा खुलविण्याच्या कामीं गोमंतकीय समाज आपला वाटा आजवर नेहमीच उचलित आला आहे.

महाराष्ट्राच्या एका विभागाने पोर्तुगीज अंमलाखालींसुद्धा मोहनिद्रेवर शास्त्रीय प्रकाश टाकणाऱ्या जगप्रसिद्ध मानसवेत्त्या **आबे फारियाला** व **कोसंबी** पितापुत्रांना जन्माला घातलें तर दुसऱ्या विभागाने **रँगलर परांजपे** व विश्वविख्यात **नारळीकर पितापुत्रांना** जन्म दिला.

ज्या भोळ्या वृत्तीच्या मराठी समुदायाने भोळ्या सांब सदाशिवाच्या लीला पत्थराच्या अंतःकरणावर कोरून शाश्वत केल्या त्याच मराठी समुदायाने स्वातंत्र्याच्या दुर्दम्य लालसेने काळ्या कातळाला मराठ्यांच्या लढाऊ किल्ल्याचें रूप दिलें नि समग्र भारताला नि जगाला असामान्य शौर्य व राजकर्तृत्व दाखवून दिलें.

### गोवा–
### महाराष्ट्र शारदेची राजधानी!

कारागिरी, कला, कौशल्य, साहित्य, विज्ञान आदि संस्कृतीच्या प्रमुख क्षेत्रांत गोमंतकीयांच्या अंगांतील प्रतिभा, प्रज्ञा, दीर्घ तपस्या वगैरे गुणांना महाराष्ट्रांत बहर येईल व गोमंतक हें महाराष्ट्र शारदेची राजधानी बनून मराठी साहित्य नि मराठी सारस्वताचे सम्राट इथें निपजतील. तसेंच तत्व–चिंतनाला वाहून घेतलेल्या महान उपासकांचा या राजधानीत उत्कर्ष होईल.

महाराष्ट्र या नांवाने नांवारुपाला आलेल्या मराठी समुदायाची रसिकता, आमची सौंदर्यासक्त विनोद कला, साहित्य, कर्तृव यांचें चीज करण्यास सदैव तत्पर राहील. राज्यकर्तृत्वामध्यें तर महाराष्ट्रांत जो चमकला त्याळा भारत ठेंगणेंच वाटेल ! गोमंत भूच्या सुपुत्रांच्या पुरुषार्थाला महाराष्ट्रा एवढें महान विशाल क्षेत्र एकसामुदायिकत्वाच्या अधिकाराने प्राप्त होणे हें निश्चित पूर्वसंचिताचें फळ होय. आम्ही ‘ पूर्वसंचित ’ हा शब्द संपूर्णपणे भौतिक–ऐतिहासिक अर्थाने वापरीत आहोत हे उघड आहे. कारण आम्ही भौतिकवादी आहोंत.

* * *

# ७

## मराठी लोकांची कोंकणी बोली

प्रत्येक माणूस घरच्या किंवा आसपासच्या माणसांकडे स्वतःच्या बोली' तच बोलत आला आहे. मानवाच्या भाषा-विकासांत 'बोली' च्या अस्तित्वाला विशिष्ट स्थान असून ग्रंथ-भाषेंत बोलणें हें प्रथम नगरांमध्येंच सुरू होत असतें. ग्रामीण विभागांतील लोक बोलीचाच वापर करीत असतात. ग्रंथ-भाषेबरोबर बोलीभाषाहि कमी अधिक प्रमाणात टिकून रहाणे किंवा नष्टप्राय होणे हें नागरी संस्कृतीच्या कमी अधिक प्रभावावर अवलंबून असतें.

जगांतल्या कांही 'बोली' पूर्ण नष्ट झालेल्या आहेत, कांही बोलींचा मिलाप झाला आहे, कांही बोलींचा ग्रंथ भाषेंत विकास झाला आहे तर कांहीं भाषांच्या बोली ठरल्या आहेत.

(I have none) ही भाषा तर (a hae·nane) ही बोली होय. परंतु कांही बोली अशा असतात कीं ज्यामध्यें ध्वनि-भिन्नतेशिवाय व्याकरण व शब्द भांडाराच्या रूपांतहि फरक असतो. म्हणून बोली आणि भाषा यांचें परस्पर नातें ठरविणारे

कांही ढोबळ नियम असले तरी विविक्षित बोली आणि विवक्षित भाषा यांचे वस्तुगत संबंध तपासूनच निष्कर्ष काढले पाहिजेत. याबाबतींत ठोकळेबाजी मुळींच उपयोगाची नाहीं.

कोंकण पट्टीमध्यें रहाणारे लोक मराठीच्या अनेक बोली बोलतात. त्यामध्यें चित्पावनी, कुडाळी, मालवणी, गोमंतकी, कारवारी वगैरे प्रमुख बोलींचा समावेश होतो. पैकीं गोमंतकाच्या किनारपट्टीच्या मध्यावर असणाऱ्या बार्देशी, तिसवाडी, व सासष्टी या तीन तालुक्यांत 'गोमंतकी' बोलीचीं खास वैशिष्टचें अधिक प्रकर्षानें दृष्टोत्पत्तीस येतात.

गोमंतकाच्या उत्तरेला असलेला पेडणे तालुका आणि पूर्वेला असलेले डिचोली व सत्तरी हे दोन तालुके १७८८ मध्यें पोर्तुगीज सत्तेखाली आले. त्यामुळें 'गोमंतकी' बोलीचा प्रभाव त्यांच्या मूळ बोलीवर जेमतेमच आहे. त्या मानाने फोंडा, सांगें, केपें, काणकोण हे चार तालुके जरा आधीं म्हणजे १७६३ मध्यें पोर्तुगीज सत्तेखालीं आले. त्यामुळें त्यांचा आणि त्यांच्या मूळबोलीचा संबंध अधिक काल दुरावला. खुद्द 'गोमंतकी' बोलीची वैशिष्टचें अधिक नजरेंत भरण्याचे कारण ती जवळ जवळ चार साडे चारशें वर्षेपर्यंत मूळ भाषेच्या विकासापासून अलग पडली हें होय. वास्तविक सारस्वत ब्राह्मणांच्या परिपाठीतली 'गोमंतकी' ही मध्ययुगीन मराठीच होय. कालांतराने व संबंधांच्या दुराव्याने ती वेगळीच बोली बनली.

पेडणे तालुक्यात बोलली जाणारी कुडाळी किंवा मालवणी बोली पेडणे तालुका गोमंतकांत समाविष्ट झाल्यानंतर जवळ

जवळ दोनशे वर्षांच्या 'गोमंतकी'च्या सान्निध्यानेहि फारशी बदललेली नाही. अर्थात कुडाळी आणि गोमंतकी एकाच मराठी परिवाराच्या बोली असल्यामुळें त्यामधलें द्वैत व अद्वैत विशिष्ट प्रकाराचेंच असणार. तथापि पेडणेकरांच्या बोलीची ध्वनिप्रकृति (Phonetic pattern) वेगळी आहे. म्हणूनच त्यांच्या विशिष्ट हेल काढून बोलण्याऱ्या पद्धतीमुळें 'गोमंतकी' बोली बोलणाऱ्यांची कधींकधीं करमणूक होते ! 'गोमंतकी' बोलींतले 'हांव' किंवा 'कितें' वगैरे मूळ शब्द ( basic vocables) पेडणेकरी बोलींत नाहींत.

मराठीच्या वेगवेगळ्या बोलींचीं ध्वनिप्रकृतिही भिन्न भिन्न आहे. तेव्हां भिन्न ध्वनिप्रकृति हें भाषाद्वैताचें लक्षण एका-दृष्टीने महत्वाचें असलें तरी भारतीय उपभाषांच्या आणि बोलींच्या संदर्भांत तें जशाचें तसें लागू पडत नाहीं.

विख्यात भाषाशास्त्रज्ञ डॉ. **रामबिलास शर्मा** लिहितात—
**"बोलियोंमें ध्वनिभेद, व्याकरणभेद और शब्द भांडार के भेद तीनों तरह के भेद होते हैं। कहीं बोलियों में केवल ध्वनि-भेद होता है, कहीं व्याकरण भेद मुख्य होता है, कहीं दोनो भेद होते हैं। इन तीनों में मुख्य भेद है शब्दभांडार का। दो बोलियों में ध्वनिभेद हो सकता है। लेकिन ध्वनिभेद होनेसेहि दो बोलियोंकी पृथक सत्ता स्वीकार करना आवश्यक नहीं है"**
('भाषा और समाज' पृ. ३६८)

कोंकणीचें राजकारण' या आपल्या निबंधांत आमचे मित्र श्री. रवीन्द्र केळेकर म्हणतात "मी जें काहीं समजलों आहे तें बरोबर असेल तर भाषाशास्त्राच्या नियमानुसार दोन भाषा वेगळचा तेव्हाच ठरतात जेव्हां

१–त्यांच्या ध्वनिप्रकृतींत फरक असतो.

२–त्यांची व्याकरणी घडण स्वतंत्र असते.

३–त्यांचें मूळ शब्द भांडार स्वतंत्र असतें.

(कोंकणीचें राजकारण पृ. १२)

संस्कृतोत्पन्न भारतीय भाषांची व्याकरणी घडण आणि मूळ शब्द भांडार हें प्रामुख्याने एकाच संस्कृत भाषेवर अधिष्ठित असल्यामुळें त्यामधलें द्वैत अद्वैती स्वरूपाचें आहे. अर्थात देशी शब्दभांडारामधला फरक जाणवण्यासारखा असला तरी या बाबतींत भाषाभेदापेक्षा क्षेत्रभेदच अधिक महत्वाचा ठरतो. एका भाषेच्या ठराविक क्षेत्रांत सुद्धा क्षेत्रभेदामुळें परकी शब्दांची देवाण घेवाण चालू असते. म्हणून गोमंतकी व मराठी या दोन वेगवेगळचा भाषा आहेत हें ठरवण्याची शब्दभांडारभेद ही कसोटी सुद्धा फारशी उपयोगाची नाहीं.

श्री केळेकरांनी अधिक शास्त्रशुद्ध पद्धतीने मूलभूत विश्लेषण केलें असतें तर मराठी व 'गोमंतकी' किंवा त्यांच्या शब्दांत मराठी व 'कोंकणी' मधील भेद भाषा-भेदाच्या स्वरूपाचे नसून एकाच भाषापरिवारांतील भाषा व त्या भाषांतर्गत बोली यांमध्यें असलेल्या भेदाच्या स्वरूपाचे आहेत हें त्यांना सहज उमगलें असतें.

**कोंकणो आणि कोंकणी**

कोंकणी हें नावही मोठें अभ्यसनीय आहे. गोव्याच्या बोलींत 'कोंकणो' म्हणजे हिंदु असा अर्थ आहे. ख्रिस्ती बांधव हिंदूंना 'कोंकणे' म्हणतात. प्रा. अ. का. प्रियोळकरांच्या मतानुसार व्यापार उदिमासाठीं व धर्मछळाला कंटाळून गोव्यांतून निघून गेलेल्या हिंदूंना प्रथम कोचीनमध्यें हें नाव देण्यात आलें असावें व मग सर्वच ख्रिस्ती बांधवांनी गोव्यांतल्या हिंदूंना सुद्धा 'कोंकणे' संबोधावयास प्रारंभ केला असावा.

आमच्या मतें 'हिंदु' हें धर्मवाचक नाव उच्चारण्याच्या भीतीने किंवा कडव्या धर्मवादाने ख्रिस्ती बांधवांनी हिंदूंना स्थलवाचक नांवाने संबोधण्याचा परिपाठ सुरू केला असावा. कांहीं असो. परंतु हिंदूंना उद्देशूनच **फादर स्टिफन्स, फादर ऋुआ** व इतर जेजुइट पाद्रयांनी हा शब्द वापरला आहे. त्याचप्रमाणे कोंकण्याची म्हणजे हिंदूंची भाषा ती कोंकणी हा भेदसूचक आशय त्या शब्दांत गर्भित होता. अर्थात आतां ह्या शब्दाचे अर्थसंक्रमण चालू असून आतां हा शब्द कोकणपट्टीच्या बोलींना लागू करण्याचा प्रयत्न चालू आहे. परंतु भाषेच्या अचूक नामनिर्देशाच्या दृष्टीने कोंकणी शब्द चूक आहे. ह्याच बोलीला जेजुइतांनीं ब्राह्मणी भाषा (Lingoa Bramana) किंवा 'कानारी' भाषा (किनाऱ्यावरच्या लोकांची भाषा) असेंहि म्हटलें आहे.

आतां ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे कीं गोमांतकातले लोक मराठी समुदायापासून तुटल्यामुळें स्थलभेदाप्रमाणें बनलेली 'मराठी 'ची 'गोमंतकी' व 'पेडणेकरी' वगैरे बोलीच बोलत राहिले.

### कोंकणी आणि टी. बी. कुन्हा

कोंकणी ही भाषा आहे असें समजणाऱ्या लोकांमध्यें दिवंगत देशभक्त टी. बी. कुन्हा हेहि मोडतात. त्यांच्या या मतामुळें कांही पुरोगामी ख्रिस्ती बांधवांची दिशाभूल झाली आहे. टी. बी. कुन्हा यांनी गोव्याची भाषा कोंकणी असें म्हटलें असलें तरी त्याचबरोबर कोंकणपट्टीच्या लोकांची जी भाषा तीच भाषा गोव्यांतील लोकांची भाषा आहे असाहि स्पष्ट उल्लेख त्यांनी केलेला आहे. (टी. बी. कुन्हा स्मृतीग्रंथ पृ. १६६)

कोंकणपट्टीचे लोक कोणती 'बोली' बोलतात व त्यांची ग्रंथ भाषा व राज्यभाषा कोणती तें त्यांनी (रत्नागिरी जिल्ह्यांपुरतें तरी) ठरवून टाकलेंच आहे.

वास्तविक ज्या जेजुइत पाद्रीबोवांच्या भयानक कारवायांचें टी. बी. कुन्हा यांनी 'गोमंतकीय समाजाला अलग पाडण्याच्या लबाड कारवाया करणारे धर्मगुरू' असें वर्णन केलें आहे त्या जेजुइत पाद्री बोवांनीच अगदीं प्रथमपासून 'गोमंतकी'(कोंकणी) ही वेगळी भाषा ठरवण्याचें धूर्त कारस्थान रचलें. हें भाषाविषयक कारस्थान टी. बी. कुन्हा यांच्या ध्यानात येऊं शकलें नाहीं याचें कारण साम्राज्यवाद्यांनी एका गोमंतकीय जनविभागाचें केलेलें अराष्ट्रिकरण–नव्हे–स्वत्वहरण हें होय.

### साम्राज्यवादी कावा

कोणत्याहि समाजाला त्याच्या मुळापासून कायमचें तोडलें म्हणजे सांस्कृतिक दृष्ट्या तो समाज दुबळा व परावलंबी बनून

त्या समाजाच्या मानसांत पोकळी निर्माण होते. **गोमंतकीय जन-मानसांत ही पोकळी निर्माण करणे व साम्राज्यवादी विचारांवर जनतेला अवलंबून ठेवणे हें काम साधण्यासाठीं धूर्त व कपटबुद्धीच्या जेजुइतांनी कोंकणीचा सवता सुभा उभा केला.**

**शणै गोंयबाबांचा संकुचित मतवाद**

कोंकणीचे एक विद्वान समर्थक दिवंगत वामनराव वर्दे वालावलकर उर्फ **शणै गोयबाब** यांचें कोंकणी विषयींचें प्रतिपादन संकुचित मतवादाचें द्योतक असून तें अनेक अर्ध सत्यांवर आधार-लेलें आहे. एके ठिकाणीं ते म्हणतात "सोळाव्या शतकापूर्वी कोंकणी भाषेंत साहित्यनिर्मिती झाली होती कीं नाही हें मी सांगू शकत नाही. सोळाव्या शतकांत युरोपीय पाद्रींनी तिला पुढें आणली हे त्यांचे आमच्यावर मोठे उपकार झाले आहेत. मराठी ग्रांथिक वाङ्मय हें कोंकणी वाङ्मयापेक्षां केवळ तीनच शतकांनी वडील आहे. मुकुंदराजाने तेराव्या शतकांत पहिल्याप्रथम मराठी सारस्वताची रचना केली आणि आमचें कोकणी सारस्वत सोळाव्या शतकांत पुढें आलें .." (कोंकणी परिषदेतील स्वागता-ध्यक्षपदावरून केलेलें भाषण. १९४५, मुंबई)

**मराठी सारस्वताचा मागोवा**

गोदाकांठीं मराठी संस्कृति जन्माला आली. मराठी लोक 'महाराष्ट्री' नावाची प्राकृत भाषा फार प्राचीन कालापासून बोलत होते. शातवाहन कालापासूनच 'महाराष्ट्री' भाषेचा विकास सुरू झाला होता हें **'गाथा सप्तशती'** या ग्रंथावरून

दिसून येतें. हा ग्रंथ केवळ महाराष्ट्री प्राकृतांतच नव्हे तर साऱ्या भारतीय प्राचीन साहित्यांत मोलाचा ठरला आहे.

महाराष्ट्रींतूनच पुढें मराठी भाषेचा विकास होत गेला. भाषा विकासाच्या प्रक्रियेंत साधारणपणें बोलीभाषा, लेखगत भाषा, आणि ग्रांथिक भाषा असे तीन टप्पे मानतां येतात.

मराठी भाषेचा विश्वासार्ह प्राचीन उल्लेख "**कुवलयकथा माला**" या अपभ्रंश भाषेंतील काव्यग्रंथांत आढळतो. हा ग्रंथ शके ७०० च्या सुमारास **उद्योतनसुरी** याने लिहिला. त्यांत 'दिण्णले गहिल्ले उल्लविर तत्थ मरहट्टे' म्हणजे दिण्णले गहिल्ले अशासारखें बोलणारे ते मराठे वगैरे स्पष्ट उल्लेख आहे. हा उल्लेख 'दिल्ले गेल्ले उलैता ते मराठे' ह्या कोंकणी बोलीलाच अधिक लागू पडतो.

इतिहासाचार्य **राजवाडे** यांच्या मताप्रमाणे शके ४०० सुमारास मराठी भाषा बनली व त्याआधीं ती बोली होती.

कांही संशोधकांच्या मतें हा काल जरा अलीकडचा आहे. मंगळवेढें व चिकुर्डे येथील ताम्रपट राजवाडे यांच्यामतें शके ४१० व शके ६५८ मधले असून तेच सर्वांत प्राचीनतम असावे. पण ते इतके प्राचीन नसावेत असा अभिप्राय कांहीं संशोधकांनी व्यक्त केला आहे.

परंतु अत्यंत विश्वसनीय पुरावा हुडकण्यासाठीं म्हैसूर राज्यांतील 'श्रवण बेळ गोळा' म्हणजे (श्रमण धवल–सरोवर) येथील इंद्रगिरी नांवाच्या एका टेकडीवर उभ्या असलेल्या तीर्थंकर गोमतेश्वराच्या पुतळ्याकडे वळल्याशिवाय गत्यंतर नाहीं. या पुत-

ळयाच्या पायाशीं शके ५०० च्या सुमारास कोरलेल्या शिलालेखांत 'श्री चावुण्डरायें करवियले' असें देवनागरी लिपींत मराठी वाक्य सांपडतें.

सर्व साधारणपणे पांचव्या शतकापासून आठव्या शतका-पर्यंतचा काल मराठीच्या लेखगत भाषेचा काल म्हटला पाहिजे. लेखगत भाषा म्हणजे शिलालेख, ताम्रपट वगैरे रूपांनी जी अक्षर-बद्ध झाली किंवा खाजगी व्यवहार व राज्यकारभाराच्या कामाला उपयोगी पडण्याइतपत जी विकसली ती.

**मराठी ग्रंथ भाषेचा जन्म**

आज मितीस उपलब्ध असलेल्या साहित्यांत 'विवेकसिंधु' हा मुकुंदराजांचा ग्रंथ मराठींतील प्राचीनतम म्हणून गाजला आहे. हा ग्रंथ शांकर–भाष्यावर आहे. (शंकरोक्तिवरी मियां बोलिलो हे वैखरी) या ग्रंथाची भाषा अत्यंत प्रगल्भ आहे. म्हणून मराठी ग्रंथ भाषेचा प्रारंभ काल त्याहून बराच आधी म्हणजे सातव्या शतकाची अखेर किंवा आठव्या शतकाची सुरवात मानावा लागेल. कारण तेराव्या शतकांत तेव्हांच्या समाजाचें अध्यात्म, लोकव्यव-हार, गणित, ज्योतिष आदि शास्त्रें व्यक्त करूं शकेल इतकें विक-सित स्वरूप मराठीला प्राप्त झालेलें होतें व एक विस्तृत प्रदेश या भाषेने व्यापला होता ह्याचा विपुल पुरावा महानुभावी साहित्यांत उपलब्ध आहे.

**म्हणे जेजुइतांनी उपकार केले !**

वर्दे वालावलकर यांनी म्हटल्याप्रमाणें कोंकणीपेक्षां मराठी केवळ तीन शतकांनी वडील आहे हें अर्धसत्य असून मराठी ग्रंथ-

भाषा त्याहून अधिक वडील आहे. शिवाय अखंड भारताला ललामभूत होऊन राहिलेल्या एका अव्वल दर्जाच्या संस्कृतीची व श्रेष्ठ राष्ट्रीय समुदायाची ती प्रौढ भाषा आहे. परंतु वर्दे वालावलकरांच्या प्रतिपादनांत या भरीव सत्याला कांहिही किंमत नसून किंमत आहे ती या गोष्टीला कीं साम्राज्यवादी युरोपीयन पाद्रींनी कोंकणी पुढें आणून आमच्यावर उपकार केले !

**वर्दे वालावलकर** हे एक विद्वान व मनस्वी गृहस्थ होते. त्यांनी 'गोमंतकी' बोलींत विपुल व अभ्यसनीय ग्रंथलेखन केलेले आहे. **'आल्बुकेर्कान गोंय कशें जिखलें'** या त्यांच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याचा बहुमान मला मिळाला याचा मला अभिमान वाटतो. परंतु त्यांची विचारसरणी सदोष होती. त्यांच्या विचारांना भारतीय पुनरुज्जीवनाची (Indian Renaissance) बैठक नव्हती. तसेंच साम्राज्यवादविरोधी लढ्याशींहि ते समरस होऊं शकले नव्हते. भारतीय समाजाच्या उत्थानातील या दोन महान टप्प्याशीं त्यांची वैचारिक संलग्नता न साधली गेल्यामुळें भारताच्या सामाजिक व राजकीय पुनर्बांधणीच्या अनुषगांत त्यांचे विचार मागासलेले, एकांगी आणि संकुचित मतवादी ठरले आहेत. गोमंतकांत जन्माला आलेले एक श्रेष्ठ देशभक्त आणि प्रख्यात विचारवंत **धर्मानंद कोसंबी** यांनीही वर्दे वालावलकरांच्या कोंकणीवादी विचारांना उद्देशून ते संकुचित मतवादी असल्याचें म्हटलें होतें. विश्वविख्यात पंडित आणि भाषाशास्त्रज्ञ डॉ. **भांडारकरांच्या** शब्दांत 'It is only parochial patriotism' (*'GOA: Facts versus Fiction' by Prof. A. K. Priolkar P. 36*)

* * *

## ८

# लोकशाहीचा विकास आणि लोकभाषांचा प्रश्न.

लोकशाहीचा विकास आणि समाजवादाची निर्मिति या दोन गोष्टींबरोबर भारतांतील एकूण १६५२ मातृभाषांचा (शिरगणती १९६१) विकास होण्याची परिस्थिती उपलब्ध होणे शक्य आहे काय ? याला 'होय' हे उत्तर देण्यापूर्वी दोन गोष्टी स्पष्ट केल्या पाहिजेत.

पहिली ही कीं, या मातृभाषांमध्यें १५०० 'गोमंतकी' सारख्या कांही हजार व कांहीं लाख लोक बोलत असलेल्या मातृबोली आहेत. तर राजस्थानी, मैथिली, बुंदेली, ब्रज, अवधि, सिंधी, काश्मिरी, मणिपुरी, लुशाय (मिझो) भोजपुरी, वगैरे साहित्यभाषा बनलेल्या परंतु अजून राज्यभाषा न बनलेल्या अशा साठांवर मातृभाषा आहेत. उडिया, तेलगु, बंगाली, गुजराथी, मराठी, कानडी, तामीळ आदि मातृभाषा राज्यभाषाहि बनलेल्या आहेत, म्हणून या सर्व मातृभाषांच्या विकासाची एकच दिशा ठरवितां येणें अशक्य आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
क्रमांक ७५५१९ दि. [illegible]


दुसरी गोष्ट म्हणजे मातृभाषांच्या विकासाचे क्षेत्र अखिल भारतीय स्वरूपाचें असून त्याचा आशय क्रांतिकारक आहे हेंही स्पष्ट केले पाहिजे.

दा. क्र. ७५५१९

या संदर्भांत कांहीं पुरोगामी व्यक्ति सोविएत समाजरचनेचा उल्लेख करून गोमंतकी बोलीच्या विकासाचा प्रश्न उपस्थित करतात. या बाबतीत महत्त्वाचा मुद्दा हा आहे की राज्यपुनर्रचनेचा प्रश्न आणि मातृभाषेच्या किंवा लोकभाषेच्या विकासाचा प्रश्न हे अंतिम दृष्टया जरी लोकशाहीचेच प्रश्न म्हणून एकच असले तरी ते परस्पर भिन्न आहेत.

आज आपल्या देशाची घटना संघराज्यात्मक किंवा संघात्मक राज्याची आहे व त्यामुळें भाषावार राज्यपुनर्रचनेच्या प्रश्नाला असाधारण महत्त्व प्राप्त झालें आहे. पण समजा भारताची घटना जर एकात्मक किंवा एकसंध राज्याची असती व राज्यपुनर्रचनेचा वेगळा असा प्रश्नच उपस्थित झाला नसता तरी सामान्यतः मातृभाषांच्या विकासाचा प्रश्न निर्माण झालाच असता. एकभाषिक राज्यरचनेच्या तत्वांप्रमाणें तयार झालेल्या घटक राज्यांमध्येहि भिन्न मातृभाषा बोलणारे अनेक लोकसमुदाय असतातच. परंतु एखाद्या प्रौढ ग्रंथभाषेची उपभाषा असलेली मातृभाषा व ग्रंथभाषेच्या पायरीवर न आलेली मातृभाषा यांमध्यें निश्चित फरक आहे.

कारण एखाद्या प्रौढ ग्रंथभाषेची उपभाषा किंवा बोली ही पूर्णांर्थाने मागासलेली असूं शकत नाहीं. एका ठराविक अर्थानेच

ती मागासलेली असूं शकते. कारण अशा मातृभाषेचा विकास तिच्या प्रौढ रूपांतराच्या विकासाशीं सांगड घालण्यात असतो.

'गोमंतकी 'च्या विकासाबाबतची पाहिली गोष्ट म्हणजे ज लोक ती बोलतात त्यांच्यापैकीं ज्यांचा प्रौढ मराठीशी संबंध आला नाहीं त्यांचा शक्य तेवढ्या लौकर शिक्षणाच्या, प्रचाराच्या व राज्यकारभाराच्या साधनांचा उपयोग करून घेऊन त्या भाषेशीं परिचय व सलगी करून देण्याच्या प्रश्न फार महत्वाचा आहे. दुसरी गोष्ट म्हणजे गोमंतकांतलें लोकसाहित्य देवनागरींत लिपिबद्ध करून प्रौढ भाषेंत तें ओतणे ही होय. नदी जशी सागराला मिळण्यात सार्थ होते व त्यांतच लीन होण्यांत तिचा खरा विकास असतो तशाच प्रकारचा विकास हेंच अशा मातृबोलीचें अंतिम भवितव्य असतें.

तथापि भाषिक विलिनीकरणाची प्रक्रिया दीर्घकाल घेणारी असल्यामुळें व ती बोलणारांच्या तिच्याशीं जवळकीच्या भावना गुंतलेल्या असल्यामुळें मध्यंतरीच्या कालांत स्वतंत्रपणे लोकभाषेंत कांही लेखन व भाषण करतां येण्याची सोय खाजगी व सरकारमार्फत होणे आवश्यक आहे. तसेंच विद्यालयें, वाचनालयें, प्रकाशनगृहें, नाट्यगृहें, वृत्तपत्रें व नियतकालिकें वगैरे वाणीच्या आविष्काराच्या सवलतीहि लोकभाषेंत उपलब्ध करून देण्याची जबाबदारी लोकशाही सरकारने अंगावर घेतली पाहिजे.

मानवी व्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्रांत लोकभाषेला ग्रंथभाषेबरोबरीचे स्थान देण्यात आलें पाहिजे. काळाची ती एक

निकड आहे असें मानून गोमंतकांतील लोकभाषा व ग्रंथभाषा या दोन्हींचा दर्जा समान ठेवण्याचें आश्वासन व जबाबदारी महाराष्ट्र सरकारने स्वीकारावयास हवी.

सोविएत देशामध्यें भाषाप्रश्न अगदीं समाधानकारक रीतीने सोडवण्यात आला आहे असें कॉंग्रेसचे अध्यक्ष **श्री. कामराज** यांनीहि परवा बोलून दाखविलें. सोविएत मधली भाषिक परिस्थिति आमच्या परिस्थितिहूनहि अधिक गुंतागुंतीची व बिकट होती. कारण **सोविएत देश** हा एक राष्ट्र–समूह आहे. या समूहातील राष्ट्रांना संपूर्ण स्वातंत्र्य लाभलेलें आहे. त्यांच्याकडे रशियन भाषा सर्वव्यापी असली तरी सोविएत राष्ट्रांमध्यें तिचें स्थान दुय्यम आहे.

सोविएतमधल्या भाषा अनेक परिवारांतल्या असून संपूर्णतया भिन्न अशा आहेत. इन्डो–युरोपियन, आल्ताइक, कॉकेशियन आणि उराल्स असे चार प्रमुख भाषा परिवार आहेत. पैकीं इन्डो–युरोपियन भाषापरिवारांय त्या भाषा बोलणारे लोक १७ कोट आहेत. त्याचबरोबर लेट – लिथुआनियन, आर्मेनियन, रोमान्स, इराणियन, तुर्क, मोंगल, मांचुरियन व उत्तरेचे पॅलेओ आशियाच्या लोकांच्या भाषाहि आहेतच. एकंदर १२० भाषा तिथे आहेत. या सर्व भाषांना समान दर्जा प्राप्त झालेला आहे. रशियन भाषेच्या व्यक्तिरिक्त युक्रेनियन, बायलोरशियन, आर्मेनियन, जॉर्जियन आदि राष्ट्रांच्या प्रोढ भाषाहि आहेत. परंतु बहुसंख्य भाषा क्रांतिपूर्वी संपूर्णतया अविकसित अशाच होत्या.

कांहीना लिप्याहि नव्हत्या अशांना लिप्या बनवून मिळाल्या. कांहीं राष्ट्रीय जमातींच्या (Nationalities) तर नव्या भाषा घडवाव्या लागल्या. ४८ राष्ट्रीय जमातींच्या 'बोलीं' चा ग्रंथ-भाषेंत विकास झाला. नाटचगृहें, संस्कृतिगृहें, विश्वविद्यालयें, सार्वजनिक वाचनालयें इत्यादि आत्मविकासाची समग्र सामुग्री बोली-भाषिकांना मुबलक प्रमाणांत पुरवण्यात आली. सोविएत देशांत हा जो आश्चर्यकारक विकास घडून आला ती जगाच्या इतिहासां-तील एक नेत्रदीपक अशी घटना होय.

क्रांतिपूर्वीच्या रशियन साम्राज्यांत अनेक राष्ट्रें व राष्ट्रीय जमाती गुलामगिरींत व दारिद्रयांत खितपत पडल्या होत्या व रशियन भाषा त्यांच्यावर लादली गेली होती.

भाषा नसलेल्या अविकसित जमातींना भाषा प्राप्त होणे, अविकसित, अर्धविकसित व साहित्यधनाच्या बाबतींत दरिद्री अशा भाषाना साहित्यसमृद्धि प्राप्त करून घेण्याचो संधि मिळवून देणे व रशियन साहित्याचा गगनचुंबी विकास करणे या गोष्टी समाजवाद व साम्यवादामुळें तिथें शक्य झाल्या. भारतांतहि सोविएत प्रमाणे सर्व लोक-भाषांच्या विकासाचो तरतूद करता येणे असंभव नाहीं.

परंतु आमचा भाषाप्रश्न मुळांतच जरा वेगळा आहे. कारण गोवा ही मागासलेली राष्ट्रीय जमात नव्हे. किंवा संस्कृ-तीच्या निकृष्टावस्थेंतील तें एक राष्ट्रहि नव्हे. तसेच गोमंतकीय लोकांच्या भाषेला लिपी नाहीं किंवा ती निश्चितपणे अविकसित

आहे असेंहि नव्हे. आमच्या लोकभाषेला लिपी आहे एवढेंच नव्हे तर मूलध्वनि–विज्ञानाच्या ( Phonemics ) आधाराने निर्माण होऊं शकणारी वैज्ञानिक लिपी सोडल्यास ज्या लिपीच्या तोडीची दुसरी लिपी नाहीं अशी देवनागरी लिपी हें आमच्या भाषेचें वाहन आहे. **फादर स्टिफन्स** या गोऱ्या इंग्रज पाद्रीने सुद्धा १६१६ मध्यें

‘ पखिआंमाजी मयोरू
ब्रुखियांमधें कल्पतरू
भासांमधे मानुं थोरू
मराठीयेसी ’

या सुवर्णाक्षरांत ज्या भाषेची महति गायली व ज्या भाषेंत गोमंतकीयांनी अगदीं सहजतेने गुणश्रेष्ठ, अभिजात व विपुल साहित्य रचलें त्या भाषेच्या संदर्भांत सोविएत भाषाप्रश्नाची सोडवणूक ज्या रूपांत कांहीं विलिनीकरणविरोधक उपस्थित करतात तें रूप व ती पद्धती दिशाभूल करणारीं आहेत.

सोविएत प्रगतीच्या संदर्भांत इथें लागू होण्यासारखा प्रश्न जर कोणता असेल तर तो म्हणजे आमच्या ‘बोली’ व आमच्या भाषा बोलणाऱ्यांच्या विकासाचा प्रश्न होय. पण हा प्रश्न समाजवाद व विज्ञानवृद्धीशीं निगडित असल्यामुळें त्याचा उहापोह कर-करण्याचें हें स्थळ नव्हे.

इथें आणखी एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे सोविएत राज्यरचना भाषावार तत्वावर आधारलेली नसून ती

प्रामुख्याने राष्ट्रीय समुदाय व राष्ट्रीय जमातीच्या तत्वावर आधारलेली आहे ही होय. तथापि सोविएतमध्यें ज्या शास्त्रशुद्ध रीतीने राज्यशासनाच्या पातळीवरून ह्या अत्यंत गुंतागुंतीच्या प्रश्नाची सोडवणक करण्याची पराकाष्टा करण्यात आली ती समाजवादी प्रवृत्ति व पद्धती आमची भाषासमस्या सोडवण्यासाठीं निश्चित अनुकरणीय आहे.

आमच्या दुर्दैवाने भारतामध्यें भाषिक राज्यनिर्मितीचा प्रश्न हा बडा केंद्रिय भांडवलदारवर्ग व छोटा प्रादेशिक भांडवलदार वर्ग यांच्यामधील संघर्षाचा एक प्रश्न ठरला आहे व भांडवलदारी गटांच्या कुतरओढींत भारतीय जनतेच्या या अत्यंत जिव्हाळयाच्या प्रश्नाची वाताहात चालू आहे.

दारूण शोषण व जीवघेणी स्पर्धा हीं भांडवलदारी समाजरचनेचीं मूलतत्वें आहेत. या समाजरचनेच्या चौकटींत राहून हा अत्यंत गुंतागुंतीचा प्रश्न सोडवण्याची आमची खटपट असल्यामुळें कांही ठिकाणीं ह्या प्रश्नाची गुंतागुंत वाढण्याचाहि संभव आहे. म्हणून फार सावधानतेने व शास्त्रशुद्ध आकलनाच्या सहाय्याने ह्या प्रश्नाची उकल करीत गेलें पाहिजे. 'गोमंतकी' आणि मराठी यांचे भाषिक एकीकरण साधण्याचा शास्त्रशुद्ध मार्ग चोखाळला तरच संपूर्ण महाराष्ट्राचें ऐक्य वधिष्णु बनत जाईल.

या बाबतींत इतिहासाची दिशा पारखूनच पावलें उचलणे भाग असतें. सर्वसाधारणपणे राजकारणातील पक्षाभिनिवेश,

हट्टाग्रह या गोष्टींना सोडचिठ्ठी देऊनच भाषिक सांस्कृतिक प्रश्नांकडे पहावयाचें असते.

एकाच जुन्या रशियन समुदायाच्या खोडांतून प्रथम युक्रेन व मग बायलोरशिया हे बाहेर पडले. आतां त्याच सोविएत राज्यांत संपूर्ण स्वातंत्र्य उपभोगणाऱ्या अनेक छोटया मोठया राष्टीय जमातींच्या व राष्ट्रीय समुदायांच्या एकीकरणाची प्रक्रियाहि सुरु आहे. तेव्हां कोणत्या राष्ट्रीय समुदायाचें विघटन व तें कां व कोणत्या राष्ट्रीय समुदायाचे एकीकरण किंवा विलिनीकरण व तें कां हें अखिल राष्ट्राच्या अर्थिक-राजकीय केंद्रिकरणाच्या पद्धतीवर अवलंबून असतें.

या बाबतींत अखिल राष्ट्रीय आकलन व प्रामाणिक समजूत यांनांच ध्रुवतारा समजून चाललें पाहिजे. गोमंतकीय बांधवांच्या ज्ञानावर आणि समजूतपणावर आमचा विश्वास असल्यामुळें आधुनिक राज्यनीती व आधुनिक विज्ञानाच्या सहाय्याने ते या प्रश्नाकडे पहातील व योग्य तोच निर्णय घेतील.

* * *

# ९

## भाषिक राज्यें आणि काँग्रेस

भारत स्वतंत्र होण्याच्या आधींपासूनच काँग्रेस व इतर लोकशाहीवादी पक्ष एकभाषिक राज्यांचा प्रचार करीत आलेले आहेत. **लो. टिळकांनी** आणि **म. गांधीजींनी** तर हा प्रचार पुढें नेण्यांत फार हातभार लावला. असहकाराची चळवळ आणि खिलाफतीच्या चळवळीचेंहि एकभाषिक राज्यें हें ध्येय होतें.

१९२८ सालीं नेहरू कमिशनने स्वायत्त भारताच्या घटनेचा जो खर्डा तयार केला त्यांत म्हटलें आहे "प्रांताचे शिक्षण व त्याचा दैनंदिन कारभार मातृभाषेंतून व्हावयाचा तर प्रांतांत मोडणारा प्रदेश अवश्यत:च एकभाषी असला पाहिजे...सामान्यपणे विवक्षित संस्कृति, परंपरा व साहित्य यांशीं भाषेचें साधर्म्यं असतें. यामुळें भाषिक प्रांतांच्या सर्वांगीण प्रगतीला तीं वैशिष्टचें सहाय्यभूत होतील."

### भारताची बहुविध एकात्मता

एकभाषिक राज्याची मागणी ही केवळ एकभाषिकत्वाच्या तत्वावर अधिष्ठित असून उपयोगाची नाहीं हें वरील उताऱ्यावरून लक्षांत येईल. भारत हें एक वैशिष्टयपूर्ण व आगळेंच राष्ट्र आहे. भारताच्या अंतर्गत जो विविधता आहे ती इतकी उठावदार आहे कीं एखाद्या परदेशी किंवा वरवर पहाणाऱ्या अभ्यासकास भारत हें एक राष्ट्र नसून तो एक राष्ट्रसमह आहे असें वाटल्यास त्यांत नवल नाहीं.

परंतु भारतीय संस्कृतींत खोलवर अवगाहन केल्यास भारताचीं राष्ट्रीय एकात्मताच अधिक ठसठशीतपणे नजरेंत भरते. तथापि भारताच्या एकात्मतेचें वर्णन बहुविध एकात्मता असेंच करावें लागेल.

आपल्या या विशाल भारतांत सर्वसाधारणपणे ठराविक विभागांचें एकभाषिकत्व, प्रादेशिक संलग्नता, ऐतिहासिक एकजिनसीपणा किंवा ऐक्यभावना व त्यांच्या संस्कृति-विशेषांची एकरूपता आदि गोष्टींना फार महत्व आहे. या गोष्टी लक्षांत घेतल्यास या राष्ट्राच्या पोटांत अनेक राष्ट्रीय समुदाय सामावलेले आहेत असेच म्हणावें लागेल,

भारतीय उज्जीवनाचे श्रेष्ठ उद्‍गाते महर्षी रानडे यांनी केवढ्या द्रष्टेपणाने ६५ वर्षांपूर्वी पुढील शब्द लिहिले आहेत पहा, "...... those who can see far into the future of the possibilities open to a Federated India,

**distributed according to nationalities ....... ....** *('Rise of Maratha Power' P. 7)*

बहुविध एकात्मतेने युक्त अशा आमच्या संघराज्यांत लोकशाहीचा विकास घडवून आणण्यासाठीं वर उल्लेखलेल्या गोष्टींचाहि विचार करूनच एकभाषिक राज्यें बनवण्यांत आलीं.

**" Each linguistic region has a distinctive constellation of social and cultural elements .. ...** *('Towards Understanding India' by Indian Council for Cultural Relations P. 33)*

**भाषा म्हणजेच प्रौढ भाषा !**

राज्यपुनर्रचनेच्या संदर्भात भाषा म्हणजे प्रौढ भाषा असाच अर्थ समजला जातो. भारतांत शेकडों भाषा आहेत म्हणून भारत हें एकात्मराष्ट्र नव्हे हा साम्राज्यवाद्यांचा प्रचार खोटा असून भारतांत प्रौढ भाषा किंवा प्रांतीय भाषा ठराविकच आहेत असें दि. पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी स्पष्ट म्हटलेलें आहे.

**" Our great provincial languages are no dialects or vernaculars as the ignorant sometimes call them.** *('The Question of Languages' by Jawaharlal Nehru)* ते पुढें म्हणतात:-

'...... The main languages we have in India are just about a dozen ....... Each one of these is the mother tongue of no fewer than a crore of

people - some of them of many crores. Each one of these languages is important enough for a separate state and for a separate university *(Calcutta University Address 1947)*

पंडित नेहरूंनी हा प्रश्न शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केला हें खरें असलें तरी अंतीं हा प्रश्न मार्गाला लावण्याच्यावेळीं त्यांनाहि कांही प्रसंगीं शास्त्रशुद्ध कसोटीला व पायाभूत तत्वांना चिकटून रहाणे शक्य झालें नाहीं.

खरें म्हणजे कॉंग्रेस पक्षाला भारताच्या राज्यपुनर्रचनेच्या तत्वांचें नीट आकलनच झालेलें नाही. किंवा गटबाजीमुळें त्यांचें आकलन तोकडें पडत असावें व त्यामुळें अनेक चुका, गुन्हे व पापें राज्यकर्त्यांच्या हातून घडलीं ही वस्तुस्थिति नाकारता येणार नाही.

**लोकसंग्रामांचें सोनेरी पान**

आंध्रराज्याची निर्मिति व संयुक्त महाराष्ट्र समितीचा विजय हीं भाषिक राज्य निर्मितीसाठीं झालेल्या लोक संग्रामांच्या इतिहासावीं सोनेरी पाने आहेत. विशेषतः संयुक्त महाराष्ट्र समितिच्या आंदोलनाने सुरू झालेल्या महामंथनाच्या परिणामीं भारतांत भाषिक राज्यनिर्मितीच्या तत्वांचा विजय झाला.

'गोमंतकी' ही आमची मातृभाषा आहे तेव्हां ही भाषा हा भाषिक राज्याचा पाया समजून त्यावर एक गोमंतकी घटक

राज्य कां उभारूं नयें असा सवाल विलिनीकरण-विरोधकांकडून ठेवला जात होता व आमचे केंद्रीय राज्यकर्ते त्यामुळें हबकून जात होते !

**पं. नेहरू व भाषिक राज्यांचा पाया.**

वास्तविक विरोधकांच्या आक्षेपाला सरळ व सोपें उत्तर हें आहे कीं भाषिक राज्यनिर्मितीच्या तत्वांमध्यें अनुस्यूत असलेली भाषा म्हणजे नेहरूंच्या शब्दांत प्रौढ प्रांतभाषा होय.

अशा भाषा भारतांत बारा चौदाच आहेत असें नेहरूंनी म्हटलें होते व सूक्ष्म निरीक्षणांतीं १६ भाषांना त्यांनी मान्यताहि दिली.

**महात्मा गांधी व**
**नेहरूंचे निष्कर्ष !**

भाषिक राज्यांच्या कल्पनेमध्यें अंतर्भूत असलेली भाषा म्हणजे केवळ मातृभाषा नव्हे ही गोष्ट केव्हांच स्पष्ट होऊन गेली आहे. १९३७ मध्यें लिहिलेल्या आपल्या 'भाषाप्रश्न' या निबंधांत त्यानी या प्रश्नावर चांगलाच प्रकाश टाकला. पं. नेहरूंच्या या निबंधाचा विशेष हा कीं यांतले १७ निष्कर्ष महात्मा गांधींनी आपल्या 'हरिजन' पत्रांत (दि. २१-८-१९३७) प्रकाशित केले.

**मातृभाषेवर आधारलेलीं १६५२ घटक राज्यें म्हणजे काय खेळ आहे की चेष्टा आहे ?**

### भाषिक राज्यांचा तात्विक पाया

तात्विक दृष्टीने भाषिक राज्यें बनवण्याचा प्रश्न हा राष्ट्रीय आशयाचा प्रश्न आहे. आम्ही हें अशासाठीं म्हणतों कीं वर म्हटल्याप्रमाणे भारतांत ह्या ज्या प्रांतभाषा आहेत त्यांचा गाभा साधारणपणे ज्या राष्ट्रीय समुदायांचे सांस्कृतिक, सामाजिक, ऐतिहासिक ऐक्य पूर्वीच विकसित व वृद्धिगत झालें आहे त्यांना भाषेच्या पायावर एका राजकीय घटकांत समाविष्ट करणे हा आहे.

वास्तविक भाषिक राज्यरचनेचा प्रश्न फक्त राज्य कारभाराच्या सोयीचा किंवा फक्त आर्थिक विकासाचा किंवा भाषिक विकासाचा नाहीं. त्याहून खोल असें एका वेगळ्या प्रकारचें आंतरिक, ऐतिहासिक ऐक्य किंवा राष्ट्रीय सामुदायिकत्व मजबूत करणारा अशा स्वरूपाचा आहे. म्हणूनच त्यासाठीं अभूतपूर्व लोकसंग्राम उभे राहिले व अतोनात बलिदानहि घडून आलें. अशा प्रसंगीं कॉंग्रेस पक्ष या बलिदानाचें पाप नेहमीं विरोधी पक्षांवर मारून मोकळा होत आला आहे.

ह्या प्रश्नाच्या बाबतींत कॉंग्रेस कधीं राज्यकारभाराची सोय, तर कधीं आर्थिक विकासाची अनुकुलता (म्हणजे भांडवलदारांची सोय बरं का!) तर कधी नुसत्या भाषिकवादाचा जोर पाहून निर्णय घेत आली आहे. तर कधीं अन्य दुसऱ्या भांडवलदारी दडपणांना बळी पडून या महत्वाच्या राष्ट्रीय प्रश्नावर सतत हेलकावे खात अपेशी ठरली आहे. तत्वशून्यतेच्या खोल गर्तेत घसरत व पदोपदीं अडखळत पडत चाललीआहे.

**गोवा हा महाराष्ट्रच !**

गोव्यांतील बहुजन समाज हा मराठी समाजाचा अंशभाग आहे. गोव्याचा उभा इतिहास घ्या. त्यांतून पोर्तुगीज राजवटीने घातलेला धुडगूस बाजुला काढा. तसेंच वरिष्ठ वर्गाच्या आपमतलबी कारवाया व कारस्थानें वगळा व जें राहील तें मराठी असेल. तो महाराष्ट्रच असणार !

तेव्हां अशा पिंडाच्या मराठी जनतेला केंद्र प्रदेशाच्या निकृष्ट दर्जांत कांहीं काल व्यर्थ अडकवून ठेवण्याचे चाललेले प्रयत्न आमच्या जनमानसाच्या बौद्धिक प्रगतीच्या दृष्टीने किती हानिकारक आहेत तें आणखी वेगळें सांगण्याची गरज नाहीं.

* * *

# १०

## संधिसाधु प्रतिगामी राजकारण आणि म्हैसूरचा दावा

गोवाप्रश्नावर म्हैसूरने चालवलेली उपटसुंभी ही कोणत्याहि विचारी माणसाला चीड आणणारी गोष्ट आहे. म्हैसुरच्या दाव्याला गोमंतकांत एक गुंजभर सुद्धा आधार नाही. संस्कृति, भाषा, परंपरा किंवा कोणताच दुसरा महत्वाचा संबंध म्हैसुरचा गोव्याशी पोहोंचत नाहीं. काही पांच पन्नास म्हैसुरी व्यापारी गोव्यात स्थायिक झाले असतोल तेवढेच ! केवळ बेळगांव, कारवार प्रश्नावर महाराष्ट्राशी कराव्या लागणाऱ्या देवघेवीच्या मामल्यांत आपला अधिक फायदा उठवण्याच्या इराद्याने म्हैसुरी काँग्रेसवाले गोव्याच्या प्रश्नावर अडवणुकीचें धोरण धरून बसले होते.

भारताचें राज्यशासन आपल्या हातीं ठेवूं पहाणाऱ्या काँग्रेस अंतर्गत गटामध्यें मोरारजी देसाई आणि स. का. पाटलां-

**गोवा हा महाराष्ट्रच !**

गोव्यांतील बहुजन समाज हा मराठी समाजाचा अंशभाग आहे. गोव्याचा उभा इतिहास घ्या. त्यांतून पोर्तुगीज राजवटीने घातलेला धुडगूस बाजुला काढा. तसेंच वरिष्ठ वर्गाच्या आपमतलबी कारवाया व कारस्थानें वगळा व जें राहील तें मराठी असेल. तो महाराष्ट्रच असणार !

तेव्हां अशा पिंडाच्या मराठी जनतेला केंद्र प्रदेशाच्या निकृष्ट दर्जांत कांहीं काल व्यर्थ अडकवून ठेवण्याचे चाललेले प्रयत्न आमच्या जनमानसाच्या बौद्धिक प्रगतीच्या दृष्टीने किती हानिकारक आहेत तें आणखी वेगळें सांगण्याचीं गरज नाहीं.

* * *

# १०

# संधिसाधु प्रतिगामी राजकारण आणि म्हैसूरचा दावा

गोवाप्रश्नावर म्हैसूरने चालवलेली उपटसुंभी ही कोणत्याहि विचारी माणसाला चीड आणणारी गोष्ट आहे. म्हैसुरच्या दाव्याला गोमंतकांत एक गुंजभर सुद्धा आधार नाही. संस्कृति, भाषा, परंपरा किंवा कोणताच दुसरा महत्वाचा संबंध म्हैसुरचा गोव्याशी पोहोंचत नाहीं. काही पांच पन्नास म्हैसुरी व्यापारी गोव्यात स्थायिक झाले असतोल तेवढेच! केवळ बेळगांव, कारवार प्रश्नावर महाराष्ट्राशी कराव्या लागणाऱ्या देवघेवीच्या मामल्यांत आपला अधिक फायदा उठवण्याच्या इराद्याने म्हैसुरी काँग्रेसवाले गोव्याच्या प्रश्नावर अडवणुकीचें धोरण धरून बसले होते.

भारताचें राज्यशासन आपल्या हातीं ठेवूं पहाणाऱ्या काँग्रेस अंतर्गत गटामध्यें मोरारजी देसाई आणि स. का. पाटलां-

बरोबर निजलिंगाप्पाहि बसतात ही गोष्ट गोव्याच्या भवितव्याला नडणारी आहे. निजलिंगाप्पाचा गोव्यावरचा दावा आणि ना. स. का. पाटलांचा डॉ. जॅक सिकैराला पाठिंबा देण्याचा कावा ह्या गोष्टी कॉंग्रेसपक्षाचें एक अंग किती किडलें सडलें आहे आणि अंतिम देशहिताच्या दृष्टीने कॉंग्रेस किती लोकशाहीविरोधी, बेपर्वाईखोर आणि धोकेबाज बनली आहे त्याचें द्योतक आहे.

वस्तुत: गोव्याशी कानडीचा काडीमात्र संबंध नाही. इथें सांपडलेले कांही प्राचीन ताम्रपट मात्र जुन्या कन्नड लिपींत आहेत एवढेच. फोंडें महालांतील वेरें गावात 'विम्न मंत्री' यांच्या नावाचा १३४८ सालचा एक ताम्रपट सांपडला असून त्याची भाषा मराठी पण लिपी जुन्या कानडीची (हळे कन्नड) आहे. महाराष्ट्राप्रमाणें इथें गोव्यांतहि ब्राम्ही, कानडी आणि मोडी लिप्या एकेकाळीं चालत होत्या. मराठी संशोधन मंडळाच्या संग्रही असलेलें एकनाथी भागवताचें एक हस्तलिखित कानडी लिपीतलें आहे.

## म्हैसुरी दावा आहे तरी काय ?

मागें उल्लेखिलेल्या जेजुइत पाद्री **सी. एफ. सालदानाच्या** पुस्तकांत पोर्तुगालच्या गोव्यावरील दाव्याचे समर्थन जसे सांपडते तसेच म्हैसुरच्या दाव्याचें मूळहि त्या पुस्तकातच सांपडते. गोव्यावर कांही काळ विजयनगर साम्राज्याचे राजे शासन चालवत होते व विजयनगर साम्राज्याचे राजे कानडीभाषी होते. तसेच कदंबकुळाचे राजेहि म्हणे कानडी भाषी होते ! शिवाय म्हैसुर राज्य गोव्याचें शेजारी राज्य आहे व गोव्यात कोंकणी बोलली

जाते तशी कारवारमध्येहि कोंकणी बोलली जाते आणि कारवार तर अजून म्हैसूरमध्येंच आहे. म्हणून गोव्यावर म्हैसूरचा अधिकार शाबित होतो हा त्यांचा दावा !

विजयनगर आणि कदंबकुळाचे सर्व राजे कानडी होते असें गृहित धरून गोव्यावर म्हैसूरचा अधिकार मानावयाचा तर बडोदा, इंदुर, काठियावाड, बुंदेलखंड, राजपुताना आणि दक्षिणेमध्यें तंजावर पर्यंत अनेक प्रदेशांवर मराठ्यांची राज्यें होतीं म्हणून ते प्रदेश महाराष्ट्राचे मानावयाचे काय ?

मराठ्यांनी म्हैसूरहि जिकलें होतें म्हणून म्हैसूरवरहि दावा चालू शकेल इतकेच नव्हे तर दोन तृतियांश भारतावरहि महाराष्ट्र आपला अधिकार सांगू शकेल.

परंतु भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेचीं व राज्यपुनर्रचनेचीं तत्वें मूलत: वेगळीं असल्यामुळें हे विपरीत दावे बिनबुडाचे आणि म्हैसुरी कॉंग्रेसच्या राजकीय दिवाळखोरीचे द्योतक ठरतात.

**महाराष्ट्राचा दावा –**

**जनतेचा दावा**

गोवा महाराष्ट्राचा असे जेव्हां आपण म्हणतो तेव्हां त्याचा अर्थ गोव्यावर राष्ट्रकुटांचें, चालुक्यांचें किंवा यादवाचें राज्य होतें म्हणून तो महाराष्ट्राचा भाग असा नसून गोव्यांतील जनसमुदाय हा मराठी समुदायाचा अंशभाग आहे म्हणून गोवा महाराष्ट्राचा असें आम्ही समजतो.

मराठी साम्राज्याचा उदय पोर्तुगीजांच्या गोव्यातील आगमनानंतर शंभर वर्षांनी झाला, त्यापूर्वी मराठे नव्हते असें जेजुइटांनी विलिनीकरण–विरोधकांना शिकवलें आहे. तरी बरें, मराठी लोकच भारतांत पोर्तुगीजांनंतर आले असें लिहून ठेवायला ते विसरले !

उशिरा कां होइना पण देशाची केंद्रसत्ता चालवणाऱ्यांनी म्हैसूरचा दावा सपाट समूळ उखडून टाकला हा विलिनीकरणवादी गोमंतकीय जनतेचा एक पार मोठा विजयच म्हटला पाहिजे.

* * *

# ११

## विलिनीकरणानेंच गोव्याची समृद्धि साधेल !

गोव्याच्या लोकांना आर्थिक विकासाची योग्य ती कल्पना अजून आलेली नाहीं म्हणून ते विलिनीकरणासारख्या बिगर आर्थिक प्रश्नांच्या मागे लागून आपली कार्यशक्ति वाया दवडीत आहेत असें कांही विचारी लोकांचें म्हणणे असतें.

सकृद्दर्शनी हें म्हणणे सयुक्तिक वाटावें असेंच आहे व समाजवादी दृष्टिकोनांतून तर तें आणखिनच खरें असावें असें वाटतें. परंतु लोक फक्त आर्थिक प्रश्नांच्याच मागें असतात किंवा त्यांनीं असावें व जे प्रश्न प्रत्यक्षपणे आर्थिक स्वरूपाचे नसतात ते महत्वाचे नाहींत अशा प्रकारचें लोक-व्यवहाराचें निरूपण वास्तवहि नव्हे व तें शास्त्रशुद्ध समाजवादामध्यें बसणारेंहि नव्हे.

### श्रमजीवि वर्ग व बिगर आर्थिक प्रश्न

अर्थ हा समाजव्यवहाराचा पाया असला तरी बिगर आर्थिक प्रश्नाचें महत्व शास्त्रशुद्ध समाजवाद मुळींच नाकारित

नाहीं. उलट अशा प्रश्नांच्या बाबतींत श्रमजीवी वर्गांने उदासिन राहू नये असेंच लेनिनचें सुद्धा मार्गदर्शन आहे.

अशा प्रश्नांच्या बाबतींत श्रमजीवी वर्गाची धोरणें एका ठराविक मर्यादे पुरतीच भांडवलदार वर्गाला पाठिंबा देऊं शकतात. परंतु भांडवलदार वर्गाच्या धोरणाशीं संपूर्णपणे सहमत तीं कधींच असणार नाहींत. **कारण श्रमजीवी वर्ग जवान बनून जो जागतिक राजकारणाच्या आखाड्यांत उतरला आहे तो जीर्ण व मरणोन्मुख भांडलदार वर्गांच्या राजकारणाचें शेपूट बनण्याकरतां खास नव्हे. तर भांडवलदार वर्गाला उखडून काढून स्वतः राज्यसत्ता आपल्या हाती घेण्यासाठी होय.**

वर्गीय समाजरचनेत राज्यकर्ता वर्ग राष्ट्रीय, प्रांतीय किंवा जातीय दुरभिमानावर आधारलेल्या वृथा कल्पना जनतेसमोर ठेवून जनतेचें लक्ष्य मुख्य प्रश्नांवरून दूर हटवण्याचा प्रयत्न करीत असतो ही गोष्टहि सर्वसामान्य जनतेने व विशेषतः श्रमजीवी वर्गांने कदापि विसरता कामा नये.

**केंद्र सरकारचें आर्थिक सहाय्य**
**म्हणजे लांच नव्हे !**

वास्तविक गोवा प्रदेशाचा आर्थिक मागासलेपणा दूर करणे आणि गोवा–महाराष्ट्र ऐक्य साधणे यांमध्यें अंतर्विरोध कुठें आहे? गोव्याचें महाराष्ट्रांत विलिनीकरण अडवून धरण्यासाठीं म्हणून केंद्र सरकारनें पक्षपातीपणा व कावेबाजपणाने हा लटका अंतर्विरोध निर्माण करून ठेवला आहे. गोव्याचा आर्थिक विकास

भारतीय पातळीवर यावा म्हणून दहा वर्षेपर्यंत जी ठराविक मदत या प्रदेशाला देण्याचें आश्वासन केंद्र सरकारने दिलेलें आहे त्या आश्वासनाला गोव्याच्या महाराष्ट्रात होणाऱ्या विलिनीकरणाने बाध येण्याचें कारणच नाहीं.

काँग्रेसच्या अंतर्गत गटबाजीला बळी पडून यदाकदाचित केंद्र-सरकार जर ही मदत नाकारील तर त्या सरकारवर योग्य तें दडपण आणण्याच्या कामीं यापुढें गोमंतकीय जनता एकाकी पडणार नसून आमच्या खांद्याला खांदा लावून लढणास समग्र महाराष्ट्रांतील जनता स्वाभाविकपणेच पुढे सरसावेल.

शिवाय केंद्र सरकारच्या मदती इतकी मदत देण्याचें आश्वासन महाराष्ट्र सरकारकडून यापूर्वींच मिळालेलें आहे. तेव्हां विलिनीकरणाच्या व केंद्रसरकारकडून मिळणाऱ्या मदतीचा कांहीच कार्यकारण संबंध असूं शकत नाही हें उघड आहे. कारण ती मदत म्हणजे गोव्याच्या जनतेला दिलेली लांच खास नव्हे व गोव्यांची जनता लांचखोरी पत्करून आपला विलिनीकरणाचा निर्णय ढळू देईल हेंहि कदापि शक्य नाही.

**शरणागति कदापि नाही !**

परंतु राज्यां राज्यांमध्यें वितुष्ट निर्माण करून भेदाभेद पाडण्याची दुर्बुद्धि जर केंद्र सरकारला झालीच तर त्या फूट-पाडचा धोरणापुढें शरणागति पत्करण्यापेक्षां तीं धोरणें हाणून पाडणं हेंच गोमंतकीय, महाराष्ट्रीय व भारतीय जनतेचे कर्तव्य आहे.

आपला देश वरवर तरी लोकमताच्या पाठिंब्यावर चालणारा देश असल्यामुळे कोणत्याहि न्याय्य मागणीसाठीं अखिल भारतीय लोकमत जागृत करण्याचें काम यशस्वीपणें केल्यास आपला कार्यभाग साधणें शक्य होईल. एवढेंच नव्हे तर देशाचें राजकारण जाग्यावर आणण्याच्या कामांत महाराष्ट्रीयांसमवेत आम्ही आघाडीवर राहूं व आमच्या नि देशाच्या अंतिम विकासाच्या दृष्टीने ही गोष्ट फार फायद्याची ठरेल.

केंद्र सरकारने सूडबुद्धीने जर आडमुठें धोरण स्वीकारण्याचा प्रयत्न केलाच तर त्याविरुद्ध लढणे हें वाटुली एवढ्या जनसमुदायाला साधेल कीं गोवा महाराष्ट्रांतील एकीकृत जनतेच्या सामर्थ्याला साधेल ?

**गोवा-महाराष्ट्र जन ऐक्य**
**निर्णायक महत्वाचें !**

आर्थिक विकासाच्या प्रत्येक बावींत गोवा-महाराष्ट्र जनतेचा एकीकृत मोर्चाच अधिक परिणामकारी ठरूं शकेल हें निर्विवाद आहे. उदा. गोव्यांत पोलाद कारखाना असावा कीं म्हैसूरमध्यें असावा याचा फैसला एकाकी पडलेल्या गोमंतकीय जनतेच्या बाजूनें होणे कठीण आहे. कारण आंध्र, महाराष्ट्र, म्हैसूर व इतर बड्या राज्यांचा प्रभाव केंद्र सरकारावर कितीतरी पटीनी अधिक आहे.

केंद्र प्रदेशाचा कारभार म्हणजे दिल्लीच्या केंद्रीय नोकर शाहीसाठीं राखून ठेवलेलें कुरण असून तें दीड हजार मैलावर आहे हेंहि आम्ही विसरता कामा नये.

### महाराष्ट्र गरीब व भारत श्रीमंत?

कांही लोकांचें असें म्हणणे आहे की महाराष्ट्र गरीब असल्यामुळें गोव्याच्या विकासाला तो काय मदत करूं शकणार? महाराष्ट्र गरीब म्हणून गोवा त्यांत विलीन होणे जर अनिष्ट ठरतें तर भारतहि अजून गरीब असल्यामुळें गोव्याचें भारतांतील विलिनीकरणहि तितकेंच अनिष्ट ठरत नाहीं काय ?

परंतु वरील प्रकारचे कोरे अर्थवादी विचार डोक्यांत येणे हेंच आधीं चांगले लक्षण आहे काय ? कारण अशा प्रकारचा कोरा अर्थवाद हा अवास्तव व अराष्ट्रीय पण आहे !

केवळ महाराष्ट्राला हिणवण्यासाठीं म्हणून जे लोक त्या राज्याला गरीब लेखतात त्यांनी हें राज्य वरकड अर्थसंकल्पाचें राज्य (Surplus State) असून मुंबईसारखी धनकुबेर नगरी या राज्यांची राजधानी आहे ही वस्तुस्थिती नजरेआड कां करावी ?

### भांडवलदारीचें नष्टचर्य !

आमच्या देशाचा विकास कोणत्या मार्गाने व कोणत्या तत्वांवर चालू आहे व त्याचे उघड परिणाम कोणते हें समजून घेऊन मगच गोवा महाराष्ट्रांत विलीन झाल्यास जें काय होणार आहे त्यामध्यें विलिनीकरणामुळें होणारें इष्टानिष्ट कोणतें व देशाच्या भांडवलदारी आर्थिक विकासाच्या मार्गामध्येंच जे

अंगभूत दोष आहेत त्यामुळें होणारें नष्टचर्य कोणतें तें वेगळें काढता येईल.

आपल्या देशांत जी आर्थिक समाजव्यवस्था 'चालू आहे' ती भांडवलदारी समाजव्यवस्था होय. भांडवलदारी व्यवस्थेचा व भांडवलदारी विकासाचा मार्ग म्हणजेच विषमतेचा मार्ग ! माणसा माणसांमध्यें विषमता, खेड्या-खेड्यांमध्यें विषमता, ग्रामीण जीवन व नागरी जीवन यांमध्ये विषमता, तशीच शहरा शहरांमध्यें, विभागा विभागांमध्यें व राज्या राज्यांमध्यें विषमता हा भांडवलदारी समाजविकासाचा निरपवाद नियम आहे.

ह्या नियमाला धरूनच भारतांतील सर्व राज्यांतून पुढारलेले विभाग व मागासलेले विभाग यांमध्यें संघर्ष चालू आहे व परिणामी असंख्य बहुजन समाज असंतुष्ट आहे.

**छोटीं राज्यें किंवा**
**प्रदेश हा उपाय नव्हे !**

आपल्या शेजारच्या गुजराथ राज्याचेंच उदाहरण घेऊं या. सौराष्ट्र जेव्हां अलग होता तेव्हां त्याचा विकास जलद चालू होता व आतां गुजराथ हें मोठें एकभाषी राज्य बनलें आणि सौराष्ट्राचा विकास मंद झाला अशी सौराष्ट्रवाल्यांची तक्रार आहे. पण म्हणून गुजराथ राज्य मोडून त्याचे छोटे छोटे खंड करावे असें कोण म्हणेल काय ? नाहीं. कारण या दृष्टीने केवढाहि लहान विभाग केला तरी त्या विभागांत सुद्धां विकासाची विषमता ही असणारच. समजा सौराष्ट्र एक छोटेखानी राज्य

बनवलें तरी सौराष्ट्रांतल्या शहरांजवळचे दोन तीन जिल्हे इतर जिल्ह्यांहून अधिक पुढारलेले असणारच.

दुसरें उदाहरण आपल्या गोवा प्रदेशाचे घेऊं या या प्रदेशांतील तिसवाडी, सासष्टी, मुरगांव या तालुक्यांचा विकास आणि केपें, सांगें, काणकोण, पेडणें या तालुक्यांच्या विकास यामध्यें मोठे अंतर व विषमता आहे. या आर्थिक विषमतेवर आधारून या तालुक्यांनी स्वतंत्र तालुका–राज्यांची मागणी करणें योग्य ठरेल काय ? अलबत नाहीं. त्याचबरोबर कोणत्याहि प्रदेशाला केंद्र सत्तेखाली ठेवण्यानेहि आर्थिक प्रश्न सुटत नसतात.

**आर्थिक विषमता दूर करण्याचा व खरी सुबत्ता निर्माण करण्याचा उपाय राज्यपुनर्रचना नसून समाजवाद हा आहे.**

राज्यपुनर्रचना एरवीं कितीहि महत्वाची असली तरी या दृष्टीने ती दुय्यम स्वरूपाची आहे. तथापि ज्या एकभाषिक व ऐतिहासिक तत्वांवर राज्यपुनर्रचना आधारित आहे त्या तत्वांना स्वतःचे असें कांही महत्व आहेच.

**एकात्मतेच्या मार्गातील धोंड !**

कॉंग्रेसने गटबाजीला बळी पडून हीं तत्वें पायदळीं तुडवण्याचा चंग बांधला तरी त्या तत्वांचा विजयच होत आहे. **पंजाबी सुभा, हरियाना प्रांत व विशाल हिमाचल प्रदेश** या राज्यांची निर्मिति भाषिक राज्यनिर्मितीचीं तत्त्वें अजूनहि प्रचलित आहेत याचीच साक्ष आहे.

पंजाब हा एक 'राष्ट्रीय समुदाय' आहे. व त्या समुदायाची सोय होणे क्रमप्राप्त होतें.

" The Punjabis are historically, culturally and linguistically one people " *('Punjabi Suba' P. C. Joshi P. 55)*

जनतेच्या भावनात्मक ऐक्याला प्रादेशिक विषमतेचा सुरुंग लावण्याचे कारस्थान काँग्रेसच्याच हातून घडते. देशांतील सर्व जनता एका बाजूला व त्या जनतेला विषमतेच्या खोल गर्तेत ढकलणारी मक्तेदार भांडवलशाही दुसऱ्या बाजूला, हें या देशांत चालू असलेल्या विकासाचे ओंगळपण वास्तव चित्र आहे. पण हें खरें चित्र लपवून ठेवून एका विभागाला दुसऱ्या विभागाविरुद्ध, एका प्रदेशाला दुसऱ्या प्रदेशाविरुद्ध व एका राज्याला दुसऱ्या राज्याविरुद्ध खडे करावयाचें हस्तलाघव काँग्रेसने आत्मसात केलें आहे !

कोणत्याहि प्रदेशाचा आर्थिक विकास हा मूलतः प्रादेशिक कारणांपेक्षां अर्थव्यवस्थेच्या कारणांवर अधिक अवलंबून असतो. शास्त्रशुद्ध राज्यनीतीच्या या मुख्य सूत्राला गचांडी देण्याचे कामच काँग्रेसने आजवर केलें आहे. परिणामी खरी दोषी जी भांडवलशाही ती नामानिराळी राहून प्रदेशा प्रदेशांमध्यें वैमनस्यें व अंतर्विरोध वाढीला लागले आहेत. या वैमनस्यांना आणि अंतर्विरोधांना भाषावार राज्यरचना जबाबदार नसून काँग्रेसची धोरणेंच जबाबदार आहेत. भांडवलदारी समाजरचना हीच आज आमच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गांतील सर्वांत मोठी धोंड आहे.

**कलहाग्नी कोण पेटवतो ?**

प्रत्येक भांडवलदारी देशांत राष्ट्रीय एकात्मतेचे व एकंदर जनतेच्या भावनिक ऐक्याचे प्रश्न आहेतच. अमेरिकेसारख्या साम्राज्यवादी देशांत तर ते विकोपाला गेले आहेत. वर्णद्वेषापायीं दिवसा धवळ्या तिथें मुडदे पडत असतात. देशाचे सर्वे सर्वा असे जे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष त्यांचेहि तिथे खून पडतात !

अन्य भांडवलदारी देशांतही वेगळें चित्र दिसणार नाहीं. आमच्या शेजारी पाकिस्तानमध्यें इतर साऱ्या भेदांबरोबर पश्चिम पाकिस्तान व पूर्व पाकिस्तानमध्यें लढत चालू आहे. त्याचे मुख्य कारण एकच. विकासाची विषमता ! पण भांडवलदारी राजकारणाने या लढ्याला कोणते स्वरूप दिलें ? तर पंजाब मुस्लिमांविरुद्ध बंगाली मुस्लिम हें ! म्हणजे एका बाजूला हिंदूंविरुद्ध मुस्लिम, व दुसऱ्या बाजूला मुस्लिमांविरुद्ध मुस्लिम. छान साधली आहे ही गोष्ट या लोकांना ! समाजांतील पायाभूत कलह जो वर्ग कलह तो लपविण्यासाठीं धर्म कलह, जाति कलह, राज्यकलह व राष्ट्रकलह उभे करणे हें भांडवलदारी राजकारणाचे एक पुण्यकर्म असते. उभ्या इतिहासाचा हा धडा आहे.

**गोव्याचा विकास**
**अटळ आहे !**

भांडवलशाही विकासाच्या नियमांनुसार विकासाची साधनसामुग्री जिथं मुबलक प्रमाणांत व कमी खर्चांत उपलब्ध होण्यासारखी असते आणि वाहतुकीच्या साधनांची अनुकुलता असते

तिथेच खाजगी भांडवली गुंतवणुक दुडुदुडु धावत जाते व त्या प्रदेशाच्या औद्योगिक विकासाला प्रारंभ होतो. यापैकीं कांहीं साधनांची व वाहतुकीची गोव्यात अनुकुलता असल्यामुळे खाणधंद्याची भरभराट सुरू झाली. या व इतर साधनांच्या अस्तित्वामुळें ठराविक प्रमाणांत गोव्याचा भांडवलदारी विकास आतां अटळ आहे.

गोमंतकीय म्हणून आज जें कांहीं वैशिष्टचपूर्ण व प्रतिकात्मक आहे तें औद्योगिक विकासाच्या वेगाबरोबर बेचिराख होईल. महाराष्ट्रांतल्या प्रत्येक प्रदेशाप्रमाणें या प्रदेशाचेंहि वैशिष्टच असून ऐतिहासिक कारणांमुळें तर तें अधिकच प्रकर्षाने नजरेस येतें. परंतु भांडवली वरवंटयाखालीं इवल्याशा गोमंतकाच्या वैशिष्टचाची जोपासना हा अप्रतिम सुंदर असा विनोद आहे !

**वैशिष्टचासाठी विलिनीकरण !**

परंतु त्यांतल्या त्यांत या भागाचें वैशिष्टच रहावें असें आमच्याप्रमाणें ज्यांना मनोमन वाटत असेल त्यांनी गोवा महाराष्ट्र-ऐक्याचाच धावा केला पाहिजे. कारण अगतिकपणे भांडवलदारीकडे खेंचल्या जाणाऱ्या अफाट भारतांत वैशिष्टचात्मक असें कांहीं टिकवण्याच्या प्रयत्नांत काही अल्पसें यश आलेंच तर तें कोटीं कोटींच्या बनलेल्या फार मोठया राज्यांना येणें शक्य आहे.

खुद्द महाराष्ट्राएवढया एका प्रमुख राज्याला आपलें मराठीपण शाबूत ठेवणे किती अशक्य होऊन बसलें आहे त्याची प्रचिति मुंबई शहराच्या चालू विकासाकडे पाहिल्यास तत्काल येईल !

म्हणून त्यांतल्या त्यांत आमची प्रादेशिक अस्मिता जपण्यासंबंधीचा कल्पना, साम्य, आस्था, आपुलकी व जवळिक जी कांही आहे ती मराठीयत्वाशीं, मराठी भाषेशीं, मराठी संस्कृतिशी, मराठी मनाशीं आहे–मराठी माणसांशीं आहे. म्हणूनच महाराष्ट्र आमचा व आम्ही महाराष्ट्राचे आहोंत या बाबतींत कोणी कितीही निराशावादी असला तरी पूर्वग्रहदोष विरहित होऊन पाहिल्यास या वस्तुस्थितींतच त्याला आशेचे किरण दिसूं शकतील.

ज्यांना गोव्याच्या अस्मितेबाबत फाजिल आशावाद वाटत असेल त्यांनी भांडवलदारी विकास पद्धतीचा अभ्यास केल्यास त्यांचा त्या बाबतीत नक्कीच भ्रमनिरास झाल्याविना रहाणार नाहीं.

**हृदय विदारक कहाणी !**

**अशी आहे भांडवलदारी विकासाची ही हृदयविदारक कहाणी !**

गोवा विलिनीकरणाचे धूर्त विरोधक या बाबतींत नेहमी कोंकण, मराठवाडा व विदर्भाचा उल्लेख करतात. व विशेषतः कोकण व मराठवाड्याच्या मागासलेपणाकडे बोट दाखवून महाराष्ट्राच्या अभिमानाला हिणवण्याचा प्रयत्न करतात. हें करण्यांत त्यांचा मतलब असा असतो कीं पहा, तुम्ही महाराष्ट्रांत जाऊं इच्छितां व महाराष्ट्रांत गोव्याचा विकास होईल अशा भोळ्याभाबड्या आशा उराशीं बाळगून आहांत पण आधी कोंकण

व मराठवाड्याकडे जरा न्याहाळून पहा तर खरे! आणि मग गोव्याचें महाराष्ट्रांत भवितव्य काय तें ठरवा!!

या त्यांच्या मानभावीपणाच्या सांगण्यांत आणखीहि एक हेतु असतो. तो म्हणजे महाराष्ट्रीय लोक गोव्याला लुटून आपण गबर होतील व गोवा मागासलेलाच राहील अशी भीति लोकांना दाखवणे. ह्या भीतीला काही आधार आहे काय? बिलकुल नाहीं.

**विकासाचे प्रश्न**
**काय काय आहेत!**

आज आमच्या विकासाचे मुख्य प्रश्न शेतीधंद्याची निकृष्टावस्था, शेतकऱ्यांना कर्जांच्या सोयी, पशु पालनाची आबाळ, मासेमारी धंद्याचा मागासलेपणा, औद्योगिकरणाचा अभाव आदि.

**शेती सुधारणांचा**
**कार्यक्रम हवा!**

भारतीय शेतकरी हा आपल्या कामात वाकबगार व देशाच्या संपत्तीचा मुख्य आधार होय. रॉयल ॲग्रिकल्चरल सोसायटीचे डॉ. जे. ए. व्होल्कार या शास्त्रज्ञाने ब्रिटिश सरकारला सादर केलेल्या अहवालांत (१८८९) भारतीय शेतकरी कांही बाबतींत ब्रिटिश शेतकऱ्यापेक्षांहि कांकणभर सरसच ठरेल असें स्पष्ट म्हटलें आहे. अशा आमच्या या सोशिक शेतकऱ्याची परिस्थिती सुधारण्यासाठीं पुरोगामी कार्यक्रम हवा. या कार्यक्रमांत पुढील गोष्टींचा समावेश झाला पाहिजे.

१) कसेल त्याची जमीन या नियमाची कांटेकोर अंमल बजावणी-

२) सध्या अस्तित्वांत असलेल्या कम्युन्सचें (कोमुनिदादीचें) सरकारी शेतांत परिवर्तन.

३) सहकारी कसवणुकीस प्रोत्साहन.

४) जमिनदारांकडे असलेल्या वरकड जमिनीचें व अन्य उपलब्ध जमिनीचें भूमिहिनांना वांटप.

५) कौटुंबिक मालमत्तेच्या वांटणीत जमिनीचे तुकडे पडणार नाहींत अशाप्रकारे तुकडेबंदीची व्यवस्था.

६) शेत मजूरांना (मानायांना आणि कामेऱ्यांना) मजुरीचे दर ठरवून देणें.

आर्थिक मागासलेपणा हें आपल्या गरीबीचें मुख्य कारण. हा आर्थिक मागासलेपणा घालविण्यासाठीं ग्रामीण विभागांत वरील कार्यक्रम अंमलात आणणे अत्यंत आवश्यक आहे.

वरील पुरोगामी कार्यक्रम अंमलांत आणण्याच्या दृष्टीनें केंद्रप्रदेश घातुक ठरल्याविना रहाणार नाहीं. कारण केंद्र-प्रदेशाच्या बुरख्याखालीं केली जाणारी स्वतंत्र गोवा राज्याची मागणी प्रामुख्याने प्रातिगामी उद्दिष्टें डोळ्यांसमोर ठेवूनच केली जाते. सध्याच्या महाराष्ट्रवादी गोवा सरकारने केलेल्या अगदी मामुली कुळ संरक्षण कायद्यांना सुद्धा या लोकांनी विरोध केला. गोवा केंद्र प्रदेश झाल्यास खरी सत्ता स्वतंत्र गोवा राज्यवाल्यांच्या हाती जाण्याचा धोका नाकारता येत नाहीं.

### विलिनीकरणाने शेतकऱ्यांचें निश्चित हित !

महाराष्ट्रातल्या शेती सुधारणा ह्या या बाबतींत सर्वोत्तम प्रारंभ असून गोव्यातल्या शेतकऱ्याला विलिनीकरणाने त्या आपोआपच मिळणार आहेत. तसेंच बागायतीसाठींहि खास संरक्षण कायदा करावा असें महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाने ठरवलें असून त्या दृष्टीने सुद्धा केंद्र प्रदेशापेक्षां विलिनीकरणच राखणदार, खोतीदार व मुंडकारांच्या अधिक फायद्याचें होणार आहे.

गोव्याचा आर्थिक विकास, आर्थिक विकास म्हणून जे टाहो फोडतात व या संदर्भांत महाराष्ट्राच्या गरीबीचा उल्लेख करतात त्यांनी गोव्याच्या आर्थिक विकासाचा कार्यक्रम पुढें मांडावा व त्यामध्यें गोव्याचा शेतकरी, कामगार व मध्यमवर्गीयांचें काय स्थान राहील व भाटकार आणि खाण मालकांचे काय स्थान राहील तें स्पष्ट करावें.

### पशु संगोपन

शेती विकासाच्या कार्यक्रमाशीं संबधित असलेला दुसरा तितकाच महत्वाचा कार्यक्रम म्हणजे पशुसंगोपन व पशुसंरक्षण हा होय. कारण आपली शेती अजूनपर्यंत मुख्यत्वेंकरून जनावरांच्या शक्तीवरच अवलंबून आहे.

खताच्या दृष्टीनेहि जनावरांचें महत्व आहे. ग्रामीण भागांत शतीच्या खालोखाल जनावरांचें महत्व आहे. याबाबतींत पशु वैद्यकाची सोय अधिक चांगल्या रितीने उपलब्ध होणे आवश्यक आहे.

पशुधनाच्या बाबतीतली इथली परिस्थिती अत्यंत खेद-जनक आहे. यामुळे शेतीधंद्याच्या दुर्दशेबरोबर दुधदुभत्याची चण-चण फारच जाचक वाटते. याचें मूळ कारण जनावरांसाठी जी चराऊ कुरणें हवींत तीं जमिन मालकांच्या ताब्यांत असल्यामुळें शेतकऱ्यांच्या गुरांना चाऱ्याची पंचायत पडते. म्हणजे हा प्रश्न जमीन मालकांच्या मालकी हक्कावर मर्यादा घालण्याचा आहे. केंद्र प्रदेश शासनाला सुद्धा जरी हे कायदे करावेच लागणार असले तरी ते कायदे अंमलांत आणण्याच्या कामात केंद्रीय नोकरशाही व स्थानिक नोकरशाही हितसंबंधी वर्गाच्या पुढ्यांत राहून वाग-णारी असणार. महाराष्ट्रांतली परिस्थिति वेगळी आहे. महाराष्ट्रांत कामगार किसान आंदोलनाचा व पुरोगामी चळवळीचा वाढता जोर असल्यामुळें तिथें क्रांतिकारी कायद्यांना पायबंद घालतां येणे सोपी गोष्ट नाहीं,

## मासेमारीचा धंदा

निसर्गाने गोव्याला समुद्र, नद्या व छोटी छोटीं सरोवरें ह्यांची भरपूर देणगी दिली आहे. हीच गोष्ट फार प्रचंड प्रमाणा-वर महाराष्ट्राची आहे. महाराष्ट्राला ४५० मैलांचा समुद्रकिनारा आहे. गोड्यापाण्याचा विचार करतां एकूण २००० मैल लांबीच्या नद्या आणि अंदाजें तीन लाख एकर विस्ताराचे तलाव आणि सरोवरें यांचा समावेश होतो. तिथें सागरी आणि गोड्या पाण्यातील अशा दोन्ही प्रकारच्या मासेमारीचा योजनाबद्ध विकास चालू आहे. महाराष्ट्र राज्यांतील ७० टक्के लोक मासे खाणारे आहेत यावरून अन्न म्हणून तिथें मासेमारीस कसें महत्वाचें स्थान आहे तें कळून येईल.

हुकमी आणि स्वस्त मासे खायचे तर मुंबईलाच जावें लागतें हा सर्वांचाच नित्याचा अनुभव आहे. तिथें मत्सालयें, संशोधन केंद्रें, शेंकडों बर्फाचे कारखाने, शीत पेट्या, कोळयांना माशांची पिल्लें पुरवणे वगैरे गोष्टींकडे बरेंच लक्ष दिलें जातें. मुंबईला शार्क व इतर जातींच्या माशांपासून तेल काढण्याचा कारखानाही आहे.

परंतु मासेमारांच्या आर्थिक सामाजिक विकासाचा प्रश्न हा मासेमारीच्या उत्कर्षाचा प्रमुख प्रश्न आहे. त्यासाठी सहकारी मच्छिमार संस्था स्थापन केल्या पाहिजेत. महाराष्ट्रांत अशा शंभरावर संस्था आहेत. त्याच बरोबर त्यांना कर्जाच्या सोयी, मासळी खारवण्याच्या सोयी, शितगृहाच्या सोयी उपलब्ध करून देण्याचीं कामेहि सरकारमार्फत झालीं पाहिजेत. महाराष्ट्रातला कोळी किती पैसे करून आहे तें

‘ नाखवा कोळी पैशाची झोळी
सोन्याचीं कौलं घरावरती ’

या लोक गीतावरून कोणाच्याहि लक्षांत येईल. शिवाय मुंबईच्या मासळी बाजारांमध्यें मासे विकणाऱ्या बायांच्या अंगा–खांदावरील दागिने ज्यांनी पाहिले असतील त्यांना हें आवर्जून सांगण्याची गरजच नाही. अर्थात बहुसंख्य कोळी समृद्ध आहेत असें कोणीच म्हणणार नाहीं.

महाराष्ट्रांतल्या मासेमारीचें विस्ताराने वर्णन करून सांगण्याचे कारण म्हणजे विलिनीकरणामुळं या धंद्याची आबाळ

न होता उलट भरभराट होईल हें कळून यावे हे होय. उलट यांत्रिक मासेमारीचा प्रारंभ व सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे या धंद्याला बाजारपेठ मिळवून देण्याचें काम सुलभ होईल. गोव्याची मासळी रोज रत्नागिरीच्या मासळी प्रमाणे महाराष्ट्रांतल्या सर्व बाजारांत विकली जाईल. स्पेशल बोटी रोज गोवा ते मुंबई वाऱ्या करतील.

मुंबईसारखें भारतांतील पहिल्या दर्जाचें मार्केट हें आम्हाला अधिकाराने खुलें होईल व हीच गोष्ट एका ठराविक मर्यादेंत आमच्या आर्थिक समृद्धीचें पूरक अंग ठरणार आहे.

**प्रादेशिक औद्योगिक विकास**
**म्हणजे काय ?**

स्वातंत्र्य प्राप्तिनंतर या देशाची सर्वांगीण उन्नति घडवून आणण्यासाठीं औद्योगिक विकास ही सर्वांत अधिक महत्वाची बाब मानली जाणे स्वाभाविक होतें. कारण भारतासारख्या अविकसित देशाला उद्योगीकरण, नियोजन व समाजवादी राष्ट्राचें सहकार्य या गोष्टींविना देशाचें आर्थिक स्वातंत्र्य सुरक्षित राखतां येणे शक्यच नाही. त्याचबरोबर साम्राज्यवाद्यांच्या आर्थिक शोषणाच्या जोखडाखालून मुक्त होणेंहि शक्य नाहीं.

औद्योगीकरणाशीं भांडवलपुरवठ्याच्या प्रश्नाबरोबर कामगारांच्या जीवनमानाचा प्रश्न हाही निगडित आहे. कारण अंतीं श्रमशक्तींतूनच संपत्तीची पेदास होणार !

मोलमजुरी करून गुजराण करणारा कामगार किंवा मजूर शंभर दिडशें वर्षापूर्वी भारतांत नव्हता. शेतीसाठीं मोलाने काम करणारे लोक उपलब्ध होते. परंतु ज्याला मजुरी किंवा वेतन असे आपण म्हणतो त्या अर्थाने या गोष्टी भारतांत नव्हत्या. म्हणजे कामगार हा जो नवीन उदयाला आलेला आधुनिक वर्ग तो त्यावेळी नव्हता.

कामगार वर्गाचा जन्म भारतीय मोठ्या उद्योगधंद्याबरोबरच झाला. त्यापूर्वी भारतांत उद्योगधंदे होते परंतु ते सर्व लहान प्रमाणावर होते.

कालनिर्देश करून सांगावयाचे झाल्यास असें म्हणतां येईल कीं गेल्या शतकाच्या मध्यानंतर कामगार वर्ग भारतांत निर्माण झाला.

**गांवगाडा**

प्राचीन काळापासून भारताच्या लक्षावधी खेड्यापाड्यांतून पाला झापांतून दऱ्या खोऱ्यांतून चालणारा गांवगाडा जगप्रसिद्ध आहे. या भारतीय ग्राम जीवनांचे गुणदोषविवरण अनेकांनी अनेकांगांनीं केलें आहे.

पूर्वीच्या आमच्या खेड्यांतून चार वर्ग दिसले तरी प्रमुख वर्ग दोनच म्हटले पाहिजेत. शेतकरी व शेतकऱ्यांवर अवलंबून असलेला बिगर शेतकरी वर्ग. बिगर शेतकऱ्यांत अलुते बलुते (कारू-नारू) दुकानदार व फिरस्ते आले. या बिन शेत-

कऱ्यांतूनच मुसलमानी अंमलामध्ये व नंतर मिरासदार–जमिनदार –वतनदार वर्गाची पैदास झाली. बलुतेदारांच्या संख्येतच सुवर्णकार (सोनार), सुतार, लोहार, चर्मकार (चांभार) कुंभकार (कुंभार) केश कर्तनकार (न्हावी), परीट, गुरव, जोशी, कोळी, गोंधळी वगैरे कारू नारूची कामें करणारे मोडतात.

गोव्याच्या ग्रामीण भागांत चालणारा हा प्राचीन गांवगाडा प्रथम मुसलमानी अमलामुळे व नंतर पोर्तुगीज साम्राज्यवादी शासनामुळें विस्कळित झाला. मिरासदारी व जमिनदारी शोषण ज्या मानाने वाढत गेलें त्यामानाने समाजाचा कणा जो शेतकरी वर्ग तोच वांकला जाऊन परिणामी कारागीर वर्गाची दुर्दशा झाली व त्या वर्गाला गात्र सोडून पोटापाण्यासाठीं खंडाळ्याचा घाट उतरणे भाग पडलें. 'कशासाठीं पोटासाठीं खंडाळ्याच्या घाटाखालीं' हें गोमंतक धरून सर्व कोकणच्या जीवनाचें समान चित्र आहे.

**गोव्या बाहेरचे**
**गोमंतकीय**

'परंतु कन्या सासुऱ्यासी जाये मागें परतोनी पाहे' अशातलीच त्यांची स्थिती राहिली. गांवांची ओढ साहजिकच असली तरी स्वाभीमानाने जगू न देणारी स्थानिक ग्रामीण जमिनदारशाही व साम्राज्यवादी गुलामी या अरिष्टांमुळे घर हें घर व गांव हा गांव वाटेनासा होऊन हजारो लाखो लोक गांवांबाहेरच स्थायिक झाले.

## लघु उद्योगधंदे

औद्योगिकरणाचा एक प्रकार म्हणजे घरगुती व लहान उद्योगधंदे हा होय. परंतु सध्याच्या यांत्रिक युगामध्यें केवळ मनुष्य-बळावर चालणारे हे उद्योगधंदे सरकारी सहाय्याविना आधुनिक बाजारपेठेंत टिकत नाहीत.

## यांत्रिक कारखानदारी

राहता राहिला मोठ्या प्रमाणावरील अुद्योगधंद्यांचा प्रश्न. मोठ्याप्रमाणावरील अुद्योगधंदे प्रचंड यंत्रशक्तीच्या सहाय्याने सुरु होऊं शकतात व त्यासाठीं भांडवल पुरवठा ह्या महत्वाच्या प्रश्नाला तोड देणे भाग पडतें.

सरकारी कायद्याप्रमाणें २० पेक्षा जास्त लोक एका ठिकाणी एका धंद्यात एका मालकाखालीं काम करीत असले तर तो कार-खाना बनतो. यांत्रिक कारखान्याला कमीत कमी ४० लाखावर भांडवल गुंतवावें लागतें.

या प्रकारच्या औद्योगिकरणाच्या दृष्टीने गोव्याची अस्मिता ती काय करूं शकणार? भांडवलशाहींत अस्मिता असणे सोपें आहे पण भांडवल असणे सोपें नाहीं !

गोव्यांत बडेजाव करणारे व कोट्याधिशाचा आव आण-णारे फार असले तरी मोठ्या प्रमाणावरील भांडवलासाठी एक दोन भांडवलदार सोडल्यास मारवाडी, गुजराथी, सिंध्यांकडेच

गेलें पाहिजे व तीच स्थिति श्रमशक्तीची. गोव्यातले उद्योगधंदे मुख्यत: बाहेरच्या श्रमशक्तीनेच चालवले जाऊं शकतात.

या प्रकारच्या औद्योगिकरणासाठीं सहकारी व सरकारी गुंतवणुकीवरच अवलंबून राहिलें पाहिजे. सहकारी गुंतवणूक ही अंतीं सरकारी क्षेत्रांतल्या गुंतवणुकीवर अवलंबून असते. शिवाय खाजगी गुंतवणुक ही गोव्याच्या आर्थिक विकासाला मारकच ठरणार. सहकारी गुंतवणूकीला थोडें फार क्षेत्र आहे. परंतु तें मर्यादितच राहिल. सरकारी गुंतवणूकीला कांही नियम आहेत व ते राष्ट्रीय नियोजनाखाली येतात.

**नियोजनाचे राष्ट्रीय नियम !**

आपलें नियोजन हे केवळ प्रदेशवार नसून प्रकल्पवार आहे हे विसरतां कामा नये.

हवामान, पीकपाणी, भाषा, भौगोलिक रचना या कसोटयांवरून वेगळे पडणारे देशाचे नैसर्गिक विभाग आहेत. पण नियोजनाचे 'प्रदेश' हेच असतील असें नव्हे. वीजपुरवठा, वीजउत्पादन, मोठचा धरण योजना, रेल्वेमार्ग, बंदरांचा विकास अशा क्षेत्रांतले 'प्रदेश' आणि शेती सुधारणा, शेतमालाची खरेदीविक्री, कर्ज पुरवठा, ग्रामीण उद्योगधंदे या क्षेत्रांतला 'प्रदेश' यांच्या आकारांत सारखेपणा नसतो.

महाराष्ट्राचेंच पाहू या. भूपृष्ठ रचना आणि हवामान या दृष्टींनी कोंकणपट्टी, देश व वर्धा वैनगंगेचे खोरें असे तीन भाग एका

महाराष्ट्रांतच पडतात. त्यांत पाऊस पाणी, पिकें, नैसर्गिक संपत्ति यांचा विचार केला तर देश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बारा जिल्ह्यांच्या विभागांतच आणखी तीन भाग पडतात. आपल्या राष्ट्राच्या आर्थिक नियोजनात आधीं प्रादेशिक नियोजनाला स्थान व वाव कमीच आहे. प्रादेशिक नियोजन हें राष्ट्रीय नियोजन असतें.

**कोंकण राज्य हा**
**मतलबाचा विषय !**

विलिनीकरण विरोधकांमधले 'स्वतंत्र गोवा राज्य' वाले आधीं गोवा राज्य व मग कोंकण राज्य अशी ललकारी देत आहेत. या ललकारीचा आधार काय? तर कोकणपट्टी ही भौगोलिक दृष्टचा निराळी आहे. पण मग त्या दृष्टीने महाराष्ट्र राज्याचीं चार राज्ये बनवावीं लागतील व इतर राज्यांचीं प्रत्येकीं दहा वीस, दहा वीस घटक राज्यें बनवावी लागतील. तसेंच महाराष्ट्राला जसा सागरी भौगोलिक पट्टा आहे तसाच तो आंध्र, ओरिसा, बंगाल व दक्षिणेच्या सर्व राज्यांना पण आहे तेव्हां या राज्यांचे सागरी पट्टे काढून त्या पट्ट्यांचीं नवीन सागरी राज्यें बनवावीं लागतील.

अर्थात अखिल भारताच्या राज्यपुनर्रचनेच्या प्रश्नाचे अज्ञान व आमचे आचार्य काका कालेलकरांसारख्या ज्ञानीजनांचा मार्गच्युत मतलब यांमुळेंच असल्या अनर्थकारी व तथ्यशून्य कल्पना प्रसवल्या जातात.

**खनिज संपत्ति**

वास्तविक आमची खनिज संपत्ति म्हणजे प्रामुख्याने लोखंड व मँगनिज. परंतु त्याचा कस जेमतेमच आहे. वाहतुकीच्या साध-

नांच्या अनुकुलतेमुळेंच गोव्याच्या मालाला बाहेरच्या बाजारपेठा मिळूं शकतात. हॉस्पेट–बेल्लारी व महाराष्ट्रातील खनिजांचा कस वरचढ आहे. सह्याद्रीच्या उदरांत दडलेली खनिज संपत्ति याहून कितीतरी पटीने अधिक आहे. या खनिज संपत्तीची पहाणी सुरूं होऊन ती बाजारांत येऊं लागली की महाराष्ट्र खनिजांचा राजा बनेल !

**बंदर विकास**

मुंबई बंदराप्रमाणेच मुरगांव बंदराचा विकास करण्यात येईल हें उघड आहे.

**केंद्रशासन उपरें व डोईजड !**

गोव्या एवढया १४०० चौरस मैल क्षेत्रफळाच्या प्रदेशावर प्रशासन करण्याचा साडेचार कोट रुपये खर्च आपल्यावर लादून घेणें हे अनर्थकारक व विकासाच्या दृष्टीने डोईजड आहे. तसेंच शासनाचा पुरोगामीपणा ठेवण्याच्या व वाढवण्याच्या दृष्टीनेहि घातुक आहे. गोवा प्रदेशांतील एकंदर शासन–यंत्रणा एखादा छोटासाहि मक्तेदार भांडवलदार सहज आपल्या खिशांत कोबूं शकेल इतकी लहान व क्षुल्लक आहे. भांडवलदारी समाजांतल्या निवडणुका ह्या इथल्या कांहीं धनिकांचा नित्याचा खेळ व हातचा मळ ठरेल. भांडवलदारी समाजरचनेंत शासनाची व्याप्ति जेवढी अल्प तेवढा शासनाचा प्रतिगामीपणा अधिक जाचक व जुलमी ठरण्याचा संभव असतो.

**फसवे आंकडे–**
**फसवी सरासरी !**

कांहीं लोकांच्या म्हणण्यानुसार गोव्याचा आर्थिक दर्जा आतांच श्रेष्ठ असून गोव्याचें सरासरी डोईवार वार्षिक उत्पन्न ४३३ रुपये आहे तर भारताचे डोईवार सरासरी वार्षिक उत्पन्न ३३० रुपये आहे.

सध्या आम्ही वास्तवतेपेक्षां गणित व आंकड्याच्या जगांत अधिक बावरत असतो. म्हणूनच तर गणित व आंकड्यापासून अधिक सावध असलें पाहिजे. कारण गणित व आंकडे वास्तवतेचे प्रतिक. पण खुद्द वास्तवता नव्हे. गणितांत शून्याची कल्पना असते पण वास्तवतेंत शून्याचा अभाव आहे. दोन खुर्च्या, पांच पुस्तकें, पन्नास रुपये, दहा माणसें वास्तव सृष्टीमध्यें अस्तित्वांत असतात. पण दोन, पांच, पन्नास यांना अस्तित्व नाहीं तीं अस्तित्व नसणारीं प्रतिकें !

भांडवलदारी अर्थशास्त्राच्या पद्धतीने तयार केलेली आंकडे-वारी किती दिशाभूल करणारी असते व त्यांच्या अहवालांना इतिहास केराची टोपलीच कशी दाखवतो तें सध्या तरी भारतांत कुणालाच सांगावयाला नको !

एकदां एका राज्यांतील एका प्रांतात राहणारे १०० टक्के कलावंत एकाएकी मृत्युमुखी पडल्याची वार्ता कानीं पडतांक्षणींच सर्व राज्यावर अवकळा पसरली व शासनाच्या वरिष्ट पातळी-वरून या मृत्युचीं कारणें काय असावींत या विषयीं जोराचा तपास

सुरू झाला. परंतु तपासाअंतीं असें आढळून आलें कीं त्या प्रांतांत एकच कलावंत रहात होता व तो म्हातारा होऊन नैसर्गिक मृत्यू-नेच मरण पावला होता !

सारांश, सरकारकडून पेश केल्या जाणाऱ्या सरासरी व आंकडेवारीकडे सावधपणाने पाहिलें पाहिजे. गोव्याचें दरडोई उत्पन्न ४४० रुपये आहे याचा अर्थ हाच की चोरीच्या व्यापाराने जमलेले कोटचावधी रुपये कांहीं लोकांकडें पुंजलेले आहेत व तें जमेला धरूनच ही उत्पन्नवाढीची फुगीर सरासरी दाखवण्यात आली आहे. गोव्याच्या समृद्धीचा हा निर्देशांक फसवा आहे हें उघड आहे.

**घसरलेलें अर्थशास्त्र !**

श्री. पी. एस. लोकनाथन यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेल्या गोव्याच्या आर्थिक पाहणीचा एक अहवाल प्रसिद्ध झाला आहे. (Techno-economic Survey of Goa Daman and Diu by National Council of Applied Economic Research-New Delhi 1964)

या अहवालामध्यें गोवा प्रदेशाचें सरासरी दरडोई उत्पन्न १९७५ मध्यें रु. ४३३ वरून रु. २००० वर जाणार आहे व तेव्हां आपल्या भारताचें उत्पन्न रु. ३३० वरून फक्त रु. ५३० वर गेलेले असणार असें म्हटलें आहे. पण त्यासाठीं फक्त रु. ६५० कोटींची भांडवली गुंतवणूक केली पाहिजे. तरच ही किमया होणार. वा ! काय भारलें आहे एकेक दिल्लीवाल्याला या स्वतंत्र गोवा राज्यवाल्यांनी पहा ! भारतच जिथे आर्थिक दृष्टचा कः पदार्थ तिथे महाराष्ट्र तर काय दरिद्री नारायणच !

या अहवालांतून आपल्या देशाविषयीचे अशा प्रकारचे आर्थिक चिंतन निष्पन्न होणें हें त्या अहवालाच्या एकांगीपणाचें व अशास्त्रीय प्रतिपादन–पद्धतीचें लक्षण आहे. अर्थात अशा गैरलागू अहवालाचा दुरुपयोग विलिनीकरण–विरोधकांनी केला नाही तर ते विरोधकच कसले ?

वरील आर्थिक पर्यवेक्षण तयार करणारे लोक अर्थातच फार मोठे अर्थतज्ज्ञ आहेत ! पण त्यांना अर्थशास्त्रज्ञ म्हणण्यापेक्षां भांडवलदारी अर्थकारणी म्हणणेच जास्त सयुक्तिक ठरेल. भारतीय अर्थचिंतनाला भारताचा अभ्यास करतांना तो सर्वांगीण तऱ्हेने करावा लागतो. पण भांडवदारी अर्थकारणाचे तसें नाही. हें अर्थकारण फक्त भांडवलदारी दिशेनेच आंकडेमोड करीत असतें. त्याला मानवाच्या सामाजिक, सांस्कृतिक आदि इतर पैलूंशी कांहीं कर्तव्य नसतें. म्हणूनच ग्यानबाला जें समजतें व उमजतें ते ह्या भांडवलदारी अर्थकारण्यांना समजेना उमजेनासे होतें.

आर्थिक विकास म्हणजे उत्पादनांत व राष्ट्रीय उत्पादनांत वाढ इतका मर्यादित अर्थ पुरेसा ठरत नाही मनुष्यबळाचा पूर्ण वापर आणि वाढत्या उत्पादनाचें समान वितरण दोन्ही प्रादेशिक आर्थिक विकासाच्या समस्या आहेत.

" The chains in which not only the immense production but also creative potencial in the broadest sense of the agriculturists, has been held have to be broken. We have to find an answer to what is a proble m in social dynamics "
(**PROF. Gyan Chand** '*Socialist Transformation of Indian Economy*' *P. 16*)

**विलिनीकरणानेच**
**भरधांव प्रगति !**

वरील सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करणाऱ्या वाचकांची एवढी खात्री झालेली असणार की गोव्याचें महाराष्ट्रांत विलिनीकरण झालें म्हणून आर्थिक परिस्थितीवर त्याचा अनिष्ट परिणाम तर होणार नाहींच; उलट मुंबईच्या आर्थिक घडामोडीशी संपूर्णपणें संलग्न होण्याची संधि प्राप्त झाल्यामुळें आमची प्रगती भरधांव वेगाने होण्याचाच संभव अधिक आहे.

**दर्जाने विकास नव्हे**
**तर विकासने दर्जा ठरतो !**

गोव्याचा दर्जा केंद्र प्रदेशाचा की जिल्ह्याचा, की राज्याचा याला आर्थिक क्षेत्रांत काडीचेंहि महत्व नाहीं. कारण जें पुणें महाराष्ट्रांत गेल्यावर आम्हाला खाणार असे विरोधक म्हणतात तें पुणे हाही एक जिल्हाच कीं ! म्हणून पुण्याने पणजी किंवा मुरगांव खाण्याऐवजी मुरगांव सारखीं बंदरें उद्या पुण्यालाच कां खाऊं शकणार नाहींत ?

**मनोराज्याचें दारिद्र्य**
**की दरिद्री मनोराज्य ?**

उलट गोमंतकांतील तल्लख बुद्धिजीवी वर्ग महाराष्ट्राच्या राजकारणावर व कारभारावर आपली छाप बसवील असें निकोप मनोराज्य या विरोधकांना का करता येऊं नये? एकच उदाहरण द्यायचे झालें तर **ग्रेशीयस** सारखा बहुजन समाजांतील एक गोमंतकीय जर संपूर्ण भारताच्या कार्डीनलच्या महापदावर

आरुढ होऊं शकतो तर बुद्धिमान गोमंतकीय महाराष्ट्राच्या प्रांगणात आपलें योग्य तें स्थान कां हासिल करणार नाहीत ?

गोव्याच्या विलिनीकरणाने गोमंतकीयाचें कर्तृत्वक्षेत्र कितीतरी विस्तृत–विशाल होणार आहे. म्हणूनच विलिनीकरणाने आम्हां गोमंतकीयाना कांहीच गमावयाचे नसून कमवायचे मात्र सर्वच आहे !

दा. क. १५११८

**विलिनीकरण आणि धर्मनिरपेक्षता**

विलिनीकरणाचा जातीयवादाशी काडीचाही संबंध जोडणे हें आमच्या युगांत मानवद्रोहाचें व राष्ट्रद्रोहाचें खास लक्षण आहे. भारतांतील राज्यांमध्ये महाराष्ट्र राज्य हें सर्व धर्मांना समावून घेणारें राज्य म्हणूनच सुप्रसिद्ध आहे. महाराष्ट्र राज्याची राजधानी मुंबई ही त्यांचे प्रतिक आहे. हिंदु, मुस्लिम, ख्रिस्ति, पारसी, जैन, बुद्ध, शिख, लिंगायत आदि सारे तेथे गुण्यागोविंदाने आपापल्या व्यक्तित्वाचा आणि सामुदायिकत्वाचा विकास करीत आहेत.

आजच्या युगांतला सर्वांत अधिक महत्त्वाचा प्रश्न हा आर्थिक स्वातंत्र्याचा प्रश्न असून त्या दृष्टीनेच विलिनीकरणाकडे आम्ही पहातो. गोव्यांतील जनतेच्या प्रगति आड येणारें प्रतिगामी काय व तिला आर्थिक स्वातंत्र्याकडे नेणारें पुरोगामी काय याचे विश्लेषण करूनच गोव्याचे महाराष्ट्रात विलिनीकरण होण्यांत गोमंतकांतील बहुजन समाजाचे खरें व अंतिम हित आहे या निष्कर्षाप्रत आम्ही आलो आहोंत. हा निष्कर्ष सर्व गोमंकीय बंधू आपलासा करतील ही अपेक्षा !

* * *

गोमंतकांतील मुक्कामाकरितां योग्य ठिकाण

**स्वागत** लॉजिंग बोर्डिंग

पो. बॉ. नं. १२१ तारेचा पत्ता:-स्वागत

मालक:-मधुकर द. देसाई

स्टेशनरोड, मडगांव-गोवा.

---

卐 आजवर २०००० मुलांमुलीना आवडलेला.

卐 मनोरंजक आणि उद्‌बोधक असा ८ ते १२ वर्षाच्या मुलांमुलीसाठीं

एकपात्री + साभिनय + कथाकथनाचा

– शाळांतून व संस्कृति केंद्रातून करण्याजोगा कार्यक्रम –

# सुरईतला राक्षस

लेखक व निवेदक :– सुप्रसिद्ध नाटककार

श्री. रंगनाथ कुलकर्णी

गोव्यांतील प्रयोगासाठीं लिहा—

सौ. कुमुद देसाई, धारगळ, पेडणे, पो. कोलवाल-गोवा.

---

रुचकर जेवण राहण्याची उत्कृष्ट सोय

# आराम लॉजिंग आणि बोर्डिंग

दादा वैद्य रोड, पणजी-गोवा.

प्रो. ए. आर. पेडणेकर

*Dedicated to the Pharmaceutical Profession for over 35 years !*

# ★ Drogaria Salcete ★
# &
# ★ Farmacia Salcete ★

| | |
|---|---|
| **Margao-Mapusa** | **Margao-Panjim** |
| Gram : **Drogsal,** | Phone : **261 Margao** |
| **Margao** | **642 Panjim** |

---

# MADUSUDAN SRINIVAS NAIQUE

**Merchants & Manufacturers Reprereutative**
**MARGAO-GOA**

BANKERS
**The Bank of India Ltd.**
**MARGAO-GOA**

TEL. ADD.
**"SRIVIJAY", Margao**
Post Box No. **41**

उत्कृष्ट जेवण-राहण्याची उत्तम सोय
धोंड यांचे

# ★ आनंद भुवन ★

मडगांव-गोवा.

## 'LION INDUSTRITES'

CONFECTIONARY &
BISCUITS FACTORY
**BORDA-MARGAO-GOA**
Prop:- S. G. BORKER

## जनता इंडस्ट्रीयल को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि.,

आर्के-मडगांव-गोवा.

हॉस्पिटल, कार्यालयें आणि घरगुती उपयोगाचें लोखंडी
फर्निचर, तसेंच लोखंडी खिडक्या नि हातगाडे
यांचे यशस्वी उत्पादक

एक वेळ वापरून खात्री करा.

GO FOR GOLD SPOT
Popular drink of India

Goa Bottling Co. PVT Ltd.,

SUKDOW

INDUSTRIAL

the trusted name in GOA.

---

*Dealers in And Repaires of*
*Electrical Goods*

NARAYAN S GHARSE

*Station Road, Margao.*

---

*Jewellers & Transport Service*

Roulu Ananta
Verlecar

MARGAO-GOA

गोकुल

# भोजनाचे संपूर्ण समाधान !

ताजे रुचकर निर्भेळ पदार्थ

लॉजिंग, बोर्डिंग, आणि आधुनिक बार

**मडगांव–गोवा.**

---

॰ कुरकुरीत व खुसखुशीत बिस्किटें ॰

॰ स्वादिष्ट गोड बन, पाव वगैरे ॰

# जनता बेकरी

**बायना, वास्को–डी–गामा, गोवा.**

प्रो. सदानंद डी. पाटील

---

गोंव्यांत सारेंच सुंदर ! पण सर्वांत सुंदर काय हो ?

गोमंतकीय भोजन ! त्यासाठीं कोठें जाल ?

# नागेश भुवन

पणजी म्युनिसिपालिटी समोर

राहण्याची व जेवणाची उत्तम सोय

टेलिफोन ७११ प्रो. तिमापा ना. नाईक

उत्कृष्ट ! सुबक ! ! वक्तशीर ! ! !

छपाईसाठी

# नाटेकर प्रिंटिंग प्रेस

स्टेशन रोड, मडगांव

गोवा.

---

कलात्मक ○ सुंदर ○ टिकावू

छायाचित्रांसाठी गोमंतकातील नामांकित

# मावजे फोटो स्टुडिओ

स्पेशालिटी– आऊट डोअर फ्लॅश फोटोग्राफी

ग्रुप फोटोग्राफीसाठी विशेष मनपसंत

मडगांव–पणजी–वास्को, गोवा.

---

# जनरल बिल्डिंग कॉंट्रॅक्टर

पेडणें – गोवा.

प्रो.– बी. एल्. किनळेकर

आपल्या सदिच्छा व सहकार्य लाभल्यामुळेंच आम्ही
आमच्या व्यवसायांतील प्रगतीपथावरील एक एक
पाऊल पुढें टाकीत आहोंत. आपल्या या
आपुलकीबद्दल आमची कृतज्ञता व्यक्त
करून आपली सेवा आमच्याकडून
उत्तरोत्तर अधिकाधिक घडो
अशी इच्छा आम्ही व्यक्त
करीत आहोंत.

## सुकडॉ इंडस्ट्रियल लिमिटेड

मडगांव—गोवा.

---

गोव्याच्या प्रश्नास
वाहिलेले

## लोकसंग्राम

(साप्ताहिक)
पत्ता
धारगळ–पेडणे,
पो. कोलवाळ, गोवा.



FOR SPEED AND STABILITY

# Spartan

## BUILDERS

**ENGINEERS – CONTRACTORS**



**Consult for your**

**Constructions**

GRAM : VASTUSHILP Bombay
VASTUSHILP (S.N.) POONA

**Ho. 24/26 Dalal ST. Bombay 1. Tel. 254438**
**Br. 1187/7, Shivajinagar, J. M. Road, Poona 5. Tel. 55683.**

REFBK-0015118